# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक १७ | बुधवार, दि.०१ ते ०७ एप्रिल २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# देश नक्षलवादमुक्त-गृहमंत्री अमित शाह यांची लोकसभेत घोषणा

**नवी दिल्ली:-** भारत नक्षलवादमुक्त झाल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी लोकसभेत केली. माओवादी संघटनांचे सर्वोच्च नेतृत्व आणि केंद्रीय रचना जवळपास पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यात सुरक्षा दलांना यश आले असल्याचे त्यांनी सांगितले.

देशाला ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवादमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मोठ्या प्रमाणावर कारवाया करून माओवादी संघटनांवर निर्णायक कारवाई करण्यात आली, असे त्यांनी स्पष्ट केले. माओवादी पोलिटब्युरो व केंद्रीय संरचना जवळपास पूर्णपणे संपुष्टात आली आहे. "नक्षलमुक्त भारत हे आमचे लक्ष्य होते. औपचारिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर देशाला माहिती दिली जाईल, मात्र भारत नक्षलवादमुक्त झाला आहे," असे शाह यांनी जाहीर केले.

देशातील नक्षलवादाच्या भीषण समस्येला काँग्रेसचे चुकीचे धोरण जबाबदार असल्याचा थेट आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी लोकसभेत केला.दशकांपासून नक्षलवादाचे संकट घोंगावत असताना आणि त्याचे गांभीर्य मान्य करूनही काँग्रेसने ते संपवण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

नक्षलवादाच्या समस्येपासून देशाला मुक्त करण्याचे प्रयत्न या विषयावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या छत्तीसगडमधील बस्तरमधून नक्षलवाद आता जवळपास संपुष्टात आला आहे, अशी घोषणा गृहमंत्र्यांनी केली. गेल्या वर्षी अमित शहा यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देश नक्षलमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

या डेडलाइनच्या एक दिवस आधी लोकसभेत बोलताना त्यांनी नक्षलविरोधी मोहिमेच्या यशाचा पाढा वाचला. बस्तरमधील प्रत्येक गावात शाळा आणि रेशन दुकाने उघडण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. लाल दहशतीची सावली हटत असून विकासाचा नवा सूर्योदय होत आहे, असे त्यांनी नमूद केले. तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी नक्षलवाद हे काश्मीरपेक्षाही मोठे आव्हान असल्याचे मान्य केले होते. मात्र त्यावर उपाययोजना करण्यात ते अपयशी ठरल्याचेही शहा यांनी म्हटले.



### हिंसेचा मार्ग स्विकारणाऱ्यांना सोडणार नाही

**मोदी सरकार हिंसाचार कोणत्याही स्वरूपात सहन करणार नाही, असा कडक इशारा गृहमंत्र्यांनी दिला. जे शस्त्राचा आधार घेतील, त्यांना त्याची किंमत मोजावीच लागेल. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संविधानाने मार्ग दाखवला आहे, शस्त्र उचलणे हा पर्याय नाही. जम्मू-काश्मीर असो किंवा ईशान्य भारत, हिंसेचा मार्ग अवलंबणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहील, असे त्यांनी ठणकावून सांगितले.**

### सी ६० जवानांना विशेष पदकाने गौरवणार

**मुंबई : राज्यातील नक्षलवाद जवळपास संपुष्टात आला आहे. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात नक्षलवाद्यांशी निकराने झुंज देणाऱ्या सी-६० तुकडीमध्ये ३ वर्षे सेवा करणाऱ्या पोलिसांना विशेष पदक देऊन गौरवण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमव सोमवारी केली. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या परिषदेनंतर फडणवीस म्हणाले की, नक्षलवाद संपवण्यात या दलाचे योगदान मोठे आहे.**

# महाराष्ट्राची माओवादी हिंसाचार मुक्तीच्या दिशेने वाटचाल


## पोलिस अधीक्षक निलोत्पल लवकरच लक्ष्य साध्य होणार, गडचिरोली पोलिसांना पूर्ण विश्वास


**नागपूर:-** "माओवाद्यांच्या कारवायांविरोधात पोलीस विभागाने अभूतपूर्व कामगिरी बजावली असून महाराष्ट्र आता माओवादी हिंसाचारापासून मुक्तीच्या दिशेने अग्रभागी आहे. गत काही दिवसांत गडचिरोलीतील गावांमध्ये माओवाद्यांच्या हालचाली दिसून आलेल्या नसल्या तरी ६ माओवादी कॅडर्स अद्यापही महाराष्ट्र आणि छत्तीसगड सीमेवरील अबुजमाडच्या क्षेत्रात दिसून आले आहेत. त्यांनी आत्मसमर्पण करावे, यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. अन्यथा, सुरक्षा दलांना अभियान राबवावे लागेल', अशी माहिती गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी दिली आहे.

देशभरात माओवादी कारवाया संपुष्टात आणण्यासाठी केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ ही मुदत निश्चित केली आहे. या मुदतीच्या पार्श्वभूमीवर माओवादी हिंसाचाराचा नायनाट करण्यात महाराष्ट्र पोलिसांची कामगिरी अभूतपूर्व अशीच राहिलेली आहे. "मागील दोन वर्षात गडचिरोली आणि गोंदियात पोलिसांनी केलेली कारवाई आणि सध्याची एकूणच परिस्थिती पाहता आम्ही आमचे लक्ष्य साध्य करण्याच्या उंबरठ्यावर आहोत,' असे पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी आत्मविश्वासाने सांगितले.

"फेब्रुवारीपासून माओवाद्यांच्या कुठल्याही हालचाली आमच्या रेकॉर्डवर नाहीत. पण, त्यांचे आमच्या रेकॉर्डवर असलेले ६ कॅडर्स अद्यापही शिल्लक असून पूर्वी त्यांच्या हालचाली महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर दिसून आल्या होत्या. त्यापैकी ५ कॅडर्स छत्तीसगड तर एक जण गडचिरोलीचा असल्याची आमची माहिती आहे.

महाराष्ट्रातील कुठल्याही गावात त्यांचा वावर नाही,' अशी माहिती पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी दिली. शेजारच्या छत्तीसगड आणि झारखंडमध्ये अद्यापही अनुक्रमे ५० आणि ६० च्या संख्येने सशस्त्र माओवादी शिल्लक असल्याची माहिती असून त्यांचे आत्मसमर्पण व्हावे, यासाठी तेथील राज्य दलांचे प्रयत्न सुरु आहेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले.






### माओवादी हिंसाचारात महाराष्ट्र.. (१९८० ते मार्च २०२६)

| | |
|---|---|
| शहीद पोलीस जवान | -२४४ |
| ठार माओवादी | -३६८ |
| अटक झालेले माओवादी | -४२२१ |
| आत्मसमर्पण केलेले माओवादी | -१६१३ |
| माओवादांनी केलेल्या नागरिकांच्या हत्या | -६०९ |
| शासकीय वाहनांची जाळपोळ | -८३ |
| खासगी वाहनांची जाळपोळ | -१७१ |
| घडवून आणलेले स्फोट | -११८ |

### उत्तर गडचिरोलीपासून सुरुवात

गोंदिया जिल्ह्यात यापूर्वीच माओवाद्यांच्या कारवायांवर पूर्णपणे अंकुश लावण्यात महाराष्ट्र पोलिसांना यश आले होते. मात्र, गडचिरोली जिल्ह्याच्या बाबतीत ही परिस्थिती नव्हती. १ जानेवारी, २०२४ पर्यंत संपूर्ण गडचिरोली जिल्हा पोलिसांच्या रेकॉर्डवर प्रभावित मानला गेला होता. त्यानंतर गडचिरोली पोलिसांनी जुलै २०२४ पर्यंत संपूर्ण उत्तर गडचिरोली भागावर लक्ष केंद्रित करून माओवादी हिंसाचार मुक्तीच्या दिशेने वाटचाल सुरु केली होती. २०२५ मध्ये पोलिसांनी माओवाद्यांचे सर्वच्या सर्व दलम संपुष्टात आणण्यात पोलिसांना यश आले. २०२६ च्या सुरुवातीला माओवाद्यांची कंपनी क्रमांक १० म्हणून ओळखली जाणारी शेवटची रचनाच संपुष्टात आणण्यात पोलिसांना यश आले. २६ लाखांचे बक्षीस शिरावर असलेला माओवादी नेता प्रभाकर याच्यासह काही सशस्त्र माओवादी पोलिस दलांशी झालेल्या चकमकीत ठार झाले. दुर्दैवाने, या अभियानात एका पोलिस जवान शहीद झाला.

### ऐतिहासिक यश

माओवाद्यांना आत्मसमर्पण करायला प्रवृत्त करून मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने २०२५ हे वर्ष महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक ठरले. यावर्षात तब्बल ११२ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी माओवाद्यांचा पॉलीस ब्युरो सदस्य असलेला मलोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याने आपले ६१ साथीदार आणि ५४ शस्त्रांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले. ही घडामोड राज्यात माओवाद्यांचे कंबरडे मोडण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरली,फ असे पोलिस अधीक्षक निलोत्पल यांना वाटते.

### संपूर्ण जिल्हा पोलिसांच्या नजरेखाली

माओवाद्यांविरुद्ध पोलिसांचे अभियान सुरु असतानाच दुसरीकडे गडचिरोलीच्या संपूर्ण परिसरात पोलिसांची उपस्थिती वाढविण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात आले. "मागील ३ वर्षात आम्ही दुर्गम भागात तब्बल ११ पोलिस आऊटपोस्ट्स उभारल्या आहेत. नुकतीच १९ मार्च रोजी बंगाडी येथे शेवटची आऊटपोस्ट सुरु करण्यात पोलिसांना यश आले. पूर्वी तब्बल ३ हजार किलो मीटरचे क्षेत्र पोलिसांच्या आवाक्यात नव्हते. ही पोकळी भरून काढल्यावर आता पोलिस पथके गडचिरोलीच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात झटपट पोहोचू शकतात,' असे निलोत्पल यांनी सांगितले.

### शेवटची प्रतीके हटविली

**१८ फेब्रुवारी रोजी एकाच दिवशी एटापल्ली, हैदरी, भामरागड, जिमलगट्टा, धानोरा आणि पेंढरी परिसरात गडचिरोली पोलिस, सीआरपीएफ व विशेष पथकांनी एक विशेष मोहीम राबविली. माओवादी दहशतीची शिल्लक प्रतिके ठरलेली तब्बल ४४ स्मारके उध्वस्त करण्याची निर्णायक कामगिरी सुरक्षा दलांनी बजावली.**

### १९८० मध्ये माओवादांच्या पहिला प्रवेश

**१९८० मध्ये महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात माओवादांचा तत्कालीन आंधप्रदेश व विद्यमान तेलंगाना राज्यातून प्रवेश झाला होता. २ नोव्हेंबर १९८० मध्ये पेद्दी शंकर हा पहिला माओवादी चकमकीत ठार झाला. तर २ ऑक्टोबर १९८१ रोजी पहिली घटना घडवत शिक्षकाचे हात कापले होते.**

# "नक्षलवाद गोळीने नाही,तर आदिवासींना जल जंगल जमिनीचे हक्क दिल्यानेच संपेल!"-खासदार किरसान

**गडचिरोली-**गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी लोकसभेत नियम १९३ अन्वये "नक्षलवाद' विषयावरील चर्चेत सहभागी होत आपल्या मतदारसंघातील आदिवासी बांधवांच्या ज्वलंत प्रश्नांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

यावेळी बोलताना त्यांनी ठामपणे मांडले की, नक्षलवाद ही केवळ कायदा व सुव्यवस्थेची समस्या नसून सामाजिक आणि आर्थिक अन्यायातून निर्माण झालेली समस्या आहे. त्यामुळे केवळ बंदुकीच्या गोळीने नव्हे, तर आदिवासींना त्यांच्या जल, जंगल आणि जमिनीचे हक्क मिळवून देऊनच ही समस्या कायमची संपवता येईल.

खासदार डॉ. किरसान म्हणाले की, नक्षलवादी आणि पोलीस यांच्यातील संघर्षात नेहमी सामान्य आदिवासीच भरडला जातो. अनेक वेळा संशयाच्या आधारावर निरपराध आदिवासींना अटक केली जाते आणि त्यांना वर्षानुवर्षे तुरुंगात राहावे लागते. आदिवासींना "सॉफ्ट टार्गेट' म्हणून वापरणे तात्काळ थांबवले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सुरु असलेल्या लोहखनिज खाणींमुळे (उदा. सुरजागड) पर्यावरणीय व सामाजिक परिणाम गंभीर होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. खाणींमुळे जलस्रोत दूषित होत असून आदिवासींना त्यांच्या जमिनीवरून बेदखल केले जात आहे, हे अत्यंत चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

नक्षलवादी हल्ल्यांत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील महिलांना "विशेष पोलीस अधिकारी' (SPO) म्हणून देण्यात आलेल्या तात्पुरत्या नोकऱ्या बंद केल्या जात असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. या महिलांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची मागणी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली.

तसेच सुरजागड खाण प्रकल्पांतर्गत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात आदिवासी तरुणांसाठी ट्रक योजना जाहीर करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत ८० तरुणांकडून प्रत्येकी ५० हजार रुपये जमा करूनही त्यांना ना ट्रक मिळाले, ना पैसे परत मिळाले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

याशिवाय, पिढ्यानपिढ्या शेती करत असलेल्या आदिवासींना वनविभागाकडून होत असलेल्या त्रासाबाबतही त्यांनी आवाज उठवला. रस्ते व घरांच्या बांधकामात अडथळे निर्माण करून आदिवासींना त्यांच्या हक्काच्या जमिनीवरून बेदखल केले जात असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

गडचिरोली हा नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील व आकांक्षी जिल्हा असल्याने, येथील पायाभूत सुविधा, रस्ते, शिक्षण व आरोग्य क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र सरकारने थेट १० हजार कोटी रुपयांचे विशेष पॅकेज मंजूर करावे, अशी मागणी खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी केली.

# विभागीय सरस प्रदर्शनी ठरली 'निरस'




**गोंदिया :-** महिन्याभरापुर्वी आयोजित जिल्हास्तरीय सरस महोत्सवाच्या जनजागृतीला घेवून बचत गटाच्या महिलांसह सर्वसामान्य नागरिकांनी ग्रामीण विकास यंत्रणेविरुद्ध चांगलीच नाराजी व्यक्त केली होती.त्यातच शासनाच्या आदेशान्वये यावेळी गोंदियाला विभागीय सरस प्रदर्शनी व विक्री महोत्सवाचे आयोजनाचे सौभाग्य लाभले.मात्र ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व व्यवस्थापकांच्या अड्डेलतट्टू धोरणाचा फटका या प्रदर्शनाला बसला आणि विभागीय सरस प्रदर्शनी ठरली मनिरसफ ठरल्याचे चित्र उघड्या डोळ्यांनी जनतेसह प्रशासनाला बघावे लागले.परजिल्ह्यातून आलेल्या महिला बचतगटाच्या सदस्यांनी सुध्दा आयोजकांबद्दल नाराजी व्यक्त करीत काहीच व्यवसाय होत नसल्याची खंत व्यक्त केली.

विभागस्तरावरील या प्रदर्शनीपासून बचत गटाच्या महिलांनी मोठी आशा बाळगली होती. मात्र उदघाटनाच्या दुसर्या दिवशी ३० मार्च रोजी दिवशी मोहत्सवाच्या मंडपातील सुकसुकाटामुळे सहभागी झालेल्या उद्यमशील बचत गटाच्या महिलांना विक्रीची ना उमेद दिसून आले.सकाळपासून रात्रीपर्यंत त्या मंडपात खरेदीकरीता पाहिजे तसा उत्साह नागरिकांचा दिसून आला नाही.जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या महिलांनीही त्याकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले.ना दुपारच्या कार्यक्रमात ना सायकांळच्या कार्यक्रमात मंडपातील खुर्च्या भरल्या गेल्या.उलट रिकाम्याच दिसून आल्या.३० मार्च रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशिवाय एकही अधिकारी त्या सरस प्रदर्शनाच्या स्थळी दिसून आला नाही.त्यातच या आयोजनाला घेवून पुन्हा ग्रामविकास यंत्रणाच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्हे निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) च्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी व सक्षन तसेच उद्यमशील बनविण्याच्या काम केले जात आहे. त्यातच बचत गटांच्या महिलांनी तयार केलेल्या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावे व उत्पादित मालांना बाजारात वाव मिळावी, या दृष्टीकोणातून अभियानाच्या अंतर्गत प्रदर्शनी व विली महोत्सवाचेही आयोजित केले जाते. मात्र यंत्रणाच्या नाकर्तेपणामुळे सरस प्रदर्शनी व विक्री महोत्सव फुसका बार ठरू लागले आहे. काही दिवसापुर्वी जिल्हास्तरीय प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती मात्र त्या प्रदर्शनीला हवा तेवढा प्रमाणात जनतेचा प्रतिसाद मिळाला नाही, दरम्यान जनजागृतीचा अभावही दिसून आला.त्यामुळे बचत गटाच्या महिलांना यंत्रणेवर चांगलीच नाराजी व्यक्त केली होती. एवढेच नव्हतर जिल्हा परिषद अध्यक्षांनी देखील जनजागृतीचा अभाव असल्याचे कबूल केले होते. मात्र आगामी काळात असे होणार नाही, असे आश्वासनही दिले होते.मात्र विभागीय सरस महोत्सवाच्या मंडपात मंचावरील पाहुण्यांपेक्षा त्यांच्या मार्गदर्शनाचा बोध घेणाऱ्या प्रेक्षक महिला दिसून आल्या नाही. रिकाम्या खुर्चीपुढे झालेले कार्यक्रमाने विभागीय सरस महोत्सवाचे चांगले वाभाळे काढले.



# रेती माफियांना कुणाचा आशीर्वाद?

**तिरोडा :**तिरोडा तालुक्यात अवैध रेती उत्खननाचा मुद्दा दिवसेंदिवस गंभीर होत असताना आता थेट पत्रकारांवरच हल्ले होऊ लागल्याने परिस्थिती किती बिघडली आहे, हे स्पष्ट झाले आहे. अवैध रेती माफियांच्या विरोधात सातत्याने बातम्या प्रकाशित करणाऱ्या पत्रकार अजय विश्वनाथ नंदागवळी यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ एक गुन्हा नसून प्रशासनाच्या अपयशाची जिवंत साक्ष ठरत आहे.

दि. ३० मार्च रोजी मुंडीपार मार्गावर भरदिवसा घडलेली ही घटना धक्कादायक आहे. मोटारसायकलला कट मारून खाली पाडणे, त्यानंतर मारहाण करणे, अश्लील शिवीगाळ करत जीव घेण्याची धमकी देणेङ्घहे सर्व प्रकार उघडपणे घडत असताना कायदा व सुव्यवस्थेचा धाक कुठे आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे आरोपींनी स्पष्टपणे ङ्गरेती चोरीच्या बातम्या का लावतोस?ङ्घ असा प्रश्न विचारत हल्ला केला, यावरून या घटनेचा थेट संबंध अवैध रेती उत्खननाशी असल्याचे उघड होते.या घटनेनंतर नागरिक, पत्रकार संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित आरोपींवर कठोर कलमांखाली गुन्हे दाखल करून तातडीने अटक करण्यात यावी, तसेच अवैध रेती उत्खनन करणाऱ्या संपूर्ण साखळीवर मोठी कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# नगर पालिका आवारातच अस्वच्छेचा बोजवारा




**गोंदिया:-** स्वच्छतेच्या नावावर लाखो रुपये खर्च करणाऱ्या गोंदिया नगर पालिकेच्या स्वच्छता मोहिमेचा बोजवारा उडत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. शहरात अनेक ठिकाणी ठिकाणी गटारे उघडी आहेत तर या गटारातून सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने कित्येक महिने गटारे तुडूंब भरून राहिलेली असून गटाराच्या पाण्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. तर तुंबलेली गटारे साफ करण्यासाठी स्वच्छता विभागाला वेळच मिळत नाही की काय हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे स्वच्छतेच्या नावाने दवंडी पिटणाऱ्या नगर पालिकेचा कारभार रामभरोसे असून स्वच्छता मोहिमेची ऐशी की तैशी करून टाकल्याची वस्तुस्थिती शहरातच नव्हे तर स्वत:पालिकेच्या कार्यालयातही पहावयास मिळत आहे. तर अस्वच्छता व दुर्गंधी वातावरणामुळे रोगराई पसरण्याची भीती नागरिकांमधून वर्तविली जात आहे.नगरपालिकेच्या स्वच्छता,बांधकाम व पाणी पुरवठा विभागाच्या सभापती कक्ष व कार्यालयाच्या शेजारीच मोडकळीस आलेले साहित्य अस्तव्यस्त ठेवण्यात आले असून केरकचरा सुध्दा त्याचठिकाणी उघड्यावर दिसून येतो.विशेष म्हणजे नगराध्यक्ष सचिन शेंडे,उपाध्यक्ष संतोष पटले जनता दरबार घेऊन आम्ही शहरातील नागरिकांच्या समस्या सोडवण्याचा कसा प्रयत्न करतोय हे दाखवतानाच आपल्याच कार्यालय परिसरातील अस्वच्छता,घाण आणि बेशिस्त कर्मचारी यांच्यावर अंकुश घालण्यात अपयशी ठरले आहेत.मुख्याधिकारी संदिप बोरकर यांचेही कार्यालयातील वेळापत्रक ठरलेले नसल्याने त्यांचेही वचक कार्यालयातील कर्मचारी व स्वच्छता विभागावर नसल्यानेच पालिकेच्या आवारातच अस्वच्छतेचे धिंडवडे निघायला सुरवात झाली आहे.

एकहाती सत्ता असूनही सत्ताधाऱ्यांना जनतेच्या आरोग्याचे व येथील स्वच्छतेचे काहीच सोयरसुतक नसल्याचे दिसून येत आहे व अतिशय ढिसाळ कारभार सुरू आहे.

स्वच्छतेचे संदेश देणारे सुविचार व स्लोगन शहरातील सरकारी कार्यालयांच्या भिंतींवर आणि इतर ठिकाणी लिहली आहेत. परंतु याचा काहीच फायदा झालेला नाही. शहरातील जयस्तंभ चौक, पंचायत समिती, तहसील कार्यालय परिसर, पोलीस स्टेशन ते एसडीपीओ कार्यालय,भाजीबाजार,रेल्वेस्टेशन रोड,मुख्याधिकारी यांच्याघराकडे जाणारा रस्ता,महिलाबाई गंगारुग्णालय परिसर , एसटी स्टँड, रुग्णालय अशा विविध परिसरातील नाले, गटारे उघडी असून कचरा व घाण सांडपाण्याने तुडुंब भरलेली आहेत.

गटाराच्या पाण्यात प्लॅस्टिकच्या बाटल्या, प्लॅस्टिक पिशव्या, दारूच्या बाटल्या, छोट्या मोठ्या गाड्यांचे टायर, वाया गेलेला भाजीपाला, सलूनच्या दुकानात कापलेले केस, त्याचबरोबर विविध टाकाऊ वस्तू टाकल्याने गटारे भरलेली आहेत. एकीकडे मात्र दर महिन्याला स्वच्छतेच्या नावाखाली नगर पालिका लाखो रुपये खर्च करीत आहे तरीही स्वच्छतेच्या नावाने बोंबाबोंब असून उघडी गटारे आणि त्यात तुडूंब साचलेले सांडपाणी पाहून लाखो रुपये खर्च करते कुठे ? हा प्रश्न शहरातील नागरिकांना पडला आहे.

# एनएनटीआर मधील टी ३३ वाघ राखीव क्षेत्रातच

गोंदिया :- **नवेगाव-नागझिरा व्याघ्र** प्रकल्पातील (एनएनटीआर) "पांगडी' नावाचा प्रबळ नर वाघ आणि एक वाघीण गेल्या असल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर एकच खळबळ माजली होती.मात्र नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्यावतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार "पांगडी' नर वाघ शासकीय अभिलेखानुसार छछढठ ढ ३३ असून नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील (एनएनटीआर) राखीव क्षेत्र अखढए २०२६ मध्ये नोंद झाल्याचे विभागाने स्पष्ट करीत वाघ बेपत्ता असल्याच्या वृत्तास नाकारले आहे..मात्र NT ३ वाघिणीबाबत मात्र नोंद झाली नसल्याचे म्हटले आहे. वाघ आपल्या क्षेत्रात बदल करीत असल्याने बेपत्ता झाले असे म्हणने योग्य नसल्याचे नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र साकोलीचे उपसंचालक यांनी पत्रकाद्वारे कळिवले आहे.सोबतच बफर क्षेत्रात वाघांच्या संनियत्रांची प्रकिया सुरु करण्यात आल्याचे म्हटले आहे.



### नवीन प्रौढ नराची नोंद

**सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बाहेकर यांच्यानुसार, "पांगडी' नावाने ओळखला जाणारा प्रमुख प्रौढ नर वाघ डिसेंबरपासून दिसलेला नाही. मात्र त्याच्या अधिवासात जांभडी नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका नवीन प्रौढ नराची नोंद झाल्याचे म्हटले आहे.वाघांची संख्या आणि अनुवांशिक विविधता मजबूत करण्यासाठी एनएनटीआरमध्ये पुन्हा आणलेल्या एनटी-३ या वाघिणीबद्दलही बाहेकर यांनी चिंता व्यक्त केली. "गेल्या सहा महिन्यांपासून ही वाघीण दिसलेली नाही, त्यामुळे अनिश्चितता वाढली आहे," असे ते म्हणाले.जर "प्रबळ वाघ' म्हणून ओळखला जाणारा "पांगडी नर त्याच्या अधिवासातून बेपत्ता झाला, तर या वाघिणींना आणि त्यांच्या बछड्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो," असे बाहेकर यांचे म्हणने आहे.**

## संपादकीय

# वन्ही चेतवा रे पुन्हा पुन्हा ! होण्या ओबीसी जनगणना !!

ओबीसीची जातवार जनगणना करण्यात आली पाहिजे यासाठी पुन्हा वन्ही पेटला आहे. ओबीसीची जातवार जनगणना करण्याचे आश्वासन देऊन प्रत्यक्ष जनगणना करण्याची वेळ आली तर ओबीसीचा रकानाच नाही. यामुळे संतप्त झालेला ओबीसी रस्त्यावर उतरून लढत आहे.

दशवार्षिक जनगणना हा कार्यक्रम दर दहा वर्षांनी साधारणतः अमलात येत असतो भारतातील सर्व लोकांची जनगणना होऊन त्याचा उपयोग देशातील विविध धोरणात्मक योजना आखण्यासाठी आणि रचनात्मक विकास कामासाठी करण्यात येतो. विशेषतः ज्या मागास घटकांसाठी विशेष पावले उचलण्याची गरज असते त्यासाठी या जनगणनेची आकडेवारी अधिक उपयुक्त असते. त्यानुसार दर दहा वर्षानंतर ही जनगणना करण्यात येते. परंतु यावर्षी होणारी ही जनगणना नियमित जनगणनेपेक्षा सुमारे पाच – सहा वर्षे उशिरा होऊ घातलेली असून त्या जनगणनेमध्ये ओबीसी प्रवर्गाचा विचार करण्यात आलेला नसल्यामुळे ओबीसी अतिशय संतप्त झालेला आहे. होऊ घातलेल्या जनगणनेमध्ये ओबीसीचा कॉलम टाकण्यात यावा आणि ओबीसीची जातवार जनगणना करण्यात यावी. यादृष्टीने **'वन्ही चेतवा रे पुन्हा पुन्हा'** अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

ओबीसी जातवार जनगणनेतून ओबीसी समाजातील मागासपणांची कारणे समोर येतील आणि ओबीसी समाजाला भविष्यामध्ये न्याय देण्याच्या दृष्टीने आकडेवारी समोर येईल, ओबीसी समाज घटकांना न्याय मिळावा म्हणून मोठ्या प्रमाणामध्ये हालचाली सुरू झालेल्या आहेत. मध्यंतरी ओबीसी समाजाची जनगणना करून ओबीसींच्या आरक्षणाचा विचार केला जाईल असे आश्वासन अनेकदा देण्यात आले परंतु त्या आश्वासनांचे काय झाले याचे उत्तर काही ओबीसींना मिळत नाही. साधारणतः दर दहा वर्षांनंतर होणारी जनगणना. १९३१ नंतर ओबीसीची जातवार जनगणना करण्यात आली नाही. ओबीसी समाज हा मागास समाज असून जातीव्यवस्थेमध्ये त्याचेही शोषण झालेले आहे. त्यामुळे ती शोषण व्यवस्था समजून घेण्यासाठी आणि त्या शोषण व्यवस्थेचे परिणाम ओबीसी समाजावर काय व कसे झाले याची एकंदरीत आकडेवारी समोर येण्याच्या दृष्टीने ही जनगणना होणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होत आहे. ओबीसींना आरक्षण सुरू होण्याची संविधानिक तरतूद घटनेच्या ३४० व्या कलमान–ुसार करण्यात आलेली होती त्यानुसार ओबीसी आरक्षणासंबंधी पावले उचलण्यात आलीत. १९५३ मध्ये जवाहरलाल नेहरूंनी पहिला मागासवर्ग आयोग त्यासाठी गठित केला होता. काका कालेलकर त्या आयोगाचे अध्यक्ष होते. हा भारतातील पहिला मागासवर्गीय आयोग होता, ज्याने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची ओळख पटवून त्यांच्या कल्याणासाठी शिफारसी केल्या. या आयोगाने १९५५ मध्ये अहवाल सादर केला, ज्यात २,३९९ मागास जातींची नोंद करण्यात आली होती. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची चौकशी करून त्यांच्या प्रगतीसाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या होत्या. काका कालेलकर आयोगाने केलेल्या शिफारसीत जातीला मागासलेपणाचे मुख्य कारण मानले. तांत्रिक आणि व्यावसायिक संस्थांमध्ये ७०% जागा राखीव ठेवणे.सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण. महिलांना मागास वर्ग मानणे. इ. प्रमुख शिफारशी होत.

हा अहवाल सरकारने स्वीकारला नाही, ज्यामुळे ओबीसी आरक्षणासाठी मोठा काळ वाट पहावी लागली. हा आयोग सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेले पहिले मोठे पाऊल मानले जाते.ओबीसींसाठी आरक्षणाची आवश्यकता असूनही कालेलकर आयोगाचा गांभीर्याने विचार झालेला नाही. तो आयोग तसाच थंड बसत्यात पडून राहिला .पण ओबीसीच्या मागासपणाची धग वाढतच राहिली. राजकीय पटलावर पसरु लागली. ओबीसी आरक्षणाचा वन्ही चेतत गेला.

हिंदी भाषिक प्रदेशात ओबीसी समुदाय समाजवादी नेते राममनोहर लोहिया यांचेकडे आकृष्ट होत गेले. लोहियांनी १९६० मध्ये मपिछडे पावे सौ में साठफहा नारा देत मागासवर्गीय समाजात चेतना निर्माण केली. आणि राजकीय आखाड्यात मागासवर्गीयांचे महत्त्व वाढू ला–गले. मागासवर्गीयांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या भावनेने काँग्रेसला धक्के बसू लागले. चौधरी चरणसिंग ओबीसी नेते म्हणून पुढे आले. उत्तर प्रदेशात १९७५ मध्ये हेमवतीनंदन बहुगुणा यांनी छेदीलाल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोग गठीत केला. ओबीसींना १५ टक्के आरक्षण घोषित केले.

नंतर १९७९ मध्ये बी पी मंडल यांच्या अध्यक्षतेखाली मंडल आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने देशभर दौरे करून सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या म ागासवर्गीयांची –ओबीसीची ओळख पटवण्याचे काम केले. जातीय भेदभाव दूर करण्यासाठी, लोकांसाठी आरक्षणाच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी मागासलेपणा दूर करण्यासाठी अकरा सामाजिक , आर्थिक, शैक्षणिक निर्देशांकाचा वापर करून मागासपण निश्चित केले गेले. १९८० ला मंडल आयोगाने अहवाल सादर करुन ओबीसींसाठी सरकारी नोकरीत आणि शैक्षणिक संस्थांमध्ये २७% आरक्षणाची शिफारस केली. याशिवाय ओबीसीच्या आमूलाग्र विकासासाठी अन्य महत्वपूर्ण शिफारशी केल्या.

सन १९९० ला व्ही पी सिंग यांच्या सरकारने मंडल आयोग नावाने विख्यात सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग आयोग लागू करण्याची घोषणा केली. शासकीय नोकरीत ओबीसींना २७% आरक्षण लागू केले. या घोषणेचा परिणाम असा झाला की उच्चजातीय आरक्षण विरोधकांनी तीव्र विरोध केला. भाजपने व्ही पी सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. राम मंदिराचा भावनिक मुद्दा उकरून काढला. मंडल आयोग लागू केल्यानंतर ओबीसीची लहर देशभर पसरू लागली. उत्तर भारतीय मूलभूत राजकीय वातावरण पुरेपूर बदलून गेले. याच काळात मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, नितीश कुमार शरद यादव यांच्यासारखे नेते राष्ट्रीय पातळीवर प्रभावी ठरले. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेतून कांशीराम मुलायमसिंह एकत्र येऊन भाजपचा पराभव केला. १९९२ ला बाबरी विध्वंसानंतर भाजप विजयाच्या विश्वासाने पुढे जात असताना १९९३ च्या विधानसभा निवडणुकीत सपा–बसपाने भाजपला चीत केले. मागासवर्गीय राजकारणाचा जय झाला. अनेक प्रांतांमध्ये आणि राष्ट्रीय पातळीवर ओबीसी नेतृत्वाचा विकास आणि ओबीसी धार्जीने राजकारण आकारास यायला सुरुवात झाली. सामाजिक न्यायाच्या लढाईत ओबीसीच्या संघर्षाचा आणि उत्कर्षाचा हा देदीप्यमान कालखंड अविस्मरणीय ठरला.

सन २००६ ला अर्जुन सिंग यांनी केंद्रीय शिक्षण संस्थांमध्ये ओबीसींना २७% आरक्षण( उच्च शिक्षणासाठी प्रवेश) लागू करण्याचा निर्णय घेतला. २०१० ला यूपीए सरकारने जातीय जनगणने करता पावले उचलली तत्कालीन कायदेमंत्री वीरप्पा मोईली यांनी २०११ मध्ये जनगणनेत जातींची आकडेवारी संकलित करण्यासंबंधी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्याशी पत्रव्यवहार केला. पण चिदंबरम यांनी त्याला विरोध केला. मनमोहन सिंग सरकारने पर्यायी एक संपूर्ण सामाजिक आर्थिक जाती जनगणना (एस इ सी सी) आयोजित करण्याचा निर्णय घेतला. २०११ ला ग्रामीण आणि शहरी भागात जनगणना आयोजित करण्यात आली होती. एस एस सी सी डाटा ग्रामीण विकास आणि निवास तथा नागरी दारिर्द्य निर्मूलन मंत्रालयाने डाटा प्रकाशित केला. त्यानंतर मात्र तो डाटा उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकीय आरक्षणाचा पेच निर्माण होऊन जातवार जनगणनेची निकड अधोरेखित होऊ लागली. त्यामुळे देशभर ओबीसी जातीनिहाय जनगणनेचे लोण पसरत गेले. निवडणुकांमध्ये राजकीय वातावरण तापू लागले.२०१९ च्या निवडणुकीपूर्वी ओबीसींची जातीय जनगणना करण्याचा निर्णय सरकारने घेतला. ओबीसींना एकप्रकारे आकृष्ट करण्याचा तो प्रयत्न होता हेच त्याचे फलित निघाले. निवडणुक सरली, ओबीसींची जातीय जनगणना थंड बस्त्यात पडली. अलिकडेच बिहार विधानसभा निवडणुक पार पडली. त्यापूर्वी देखील ओबीसी जनगणना करण्याचे गाजर दाखवण्यात आले.

तथापि प्रत्यक्ष नियमित जनगणना प्रक्रिया सुरू होण्याची वेळ आली असता, जनगणनेत मओबीसींचा जातीचा रकाना नाही!फ ही बाब ओबीसी विचारवंत, अभ्यासक आणि आंदोलकांच्या ध्यानात आली, आणि पुन्हा मओबीसींची जातीय जनगणना करा!फ अशी मागणी जोर धरू लागली. ओबीसींच्या जनगणनेतून आमचे हीत साधले गेले पाहिजे. ओबीसींचे हक्क मिळाले पाहिजे. असा आवाज बुलंद होऊ लागला आहे. ओबीसीची जातवार जनगणना केल्याने हिंदूंचे हीतच होणार आहे. ओबीसी हिंदू असल्यामुळे जातवार जनगणनेतून त्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, प्रशासनातील सहभाग इ. स्थिती लक्षात येईल. त्यासाठी ओबीसीची जातवार जनगणनेची मागणी आहे. एससी एसटीची जनगणना होत असून त्यांच्यासाठी अनेक तरतुदी होतात, तशा सोयी ओबीसीसाठी करता याव्या म्हणून ओबीसी जातवार जनगणनेची आग्रही मागणी पुढे आलेली आहे, जोर धरत आहे.ओबीसीची लोकसंख्या पन्नास टक्के पेक्षा अधिक आहे. हिंदू धर्माचा अर्धा हिस्सा आहे. एवढा मोठा समाज विकासापासून वंचित राहू नये म्हणून त्याच्या विकासाच्या धोरणात्मक निर्णयासाठी जातवार जनगणना करून अनेक उपाययोजना करता येईल. त्यातून या हिंदूजनांचा उत्कर्ष शक्य आहे. असे ओबीसीमधील जागृत बांधवांना वाटते. सोबतच ओबीसीची नव्हे तर संपूर्ण समाजा–चीच जातवार जनगणना हितकारक आहे. ईडबल्यूएस मधील हिंदूंचीही स्थिती लक्षात येईल. हिंदूहितैषी सर्वांनी जातवार जनगणनेची मागणी करणे देशाच्या फायद्याचे ठरेल.

ओबीसींची जनसंख्या किती? निरक्षरता, बेरोजगारी, गरीबी ओबीसीत किती? मोठमोठ्या अब्ज– कोटी उलाढालीच्या मंदिरात पुजारी,धर्मगुरु, कुंभमेळात साधू किती? नोकरीत क्लास वन, क्लास टू ओबीसी किती?मंत्रालय, राजभवन, न्यायालय,सचिवालयात उच्चपदावर, कुलगुरू, किती? श्रमजीवी, मजूर, सालगडी, अल्पभूधारक शेतकरी, मजुरम हिला, झोपडीवजा निवासी, अल्पवयीन विवाहित, क्लास थ्री,फोर श्रेणीत नोकर, यांची मोजदाद जनगणनेत व्हायला हवी. याचा थेट संबंध ओबीसींसाठी धोरणात्मक निर्णय घेताना येत असल्याचे वास्तव समोर आले आहे. मंडल आयोगाच्या अहवालानुसार ५२% लोकसंख्या ओबीसीची होती. पण राष्ट्रीय सर्वेक्षण २००६ नुसार हा आकडा घटून ४१% पर्यंत आला असे मानले जाते. त्यामुळे ओबीसीच्या आरक्षणासंबंधी राखीव जागा संबंधी अनेक प्रकरणी ओबीसी प्रश्नाचा गुंता सुटत नाही. आणि म्हणून वारंवार ओबीसीच्या जनगणनेचा भडका देशभर उडालेला आहे. गेल्या दोन दशकांत ओबीसी जातींची जनगणना करण्यासाठी प्रचंड लढा चालू आहे. पण जातवार जनगणना केली जात नाही. या लढ्याचा मवन्ही चेतवा रे पुन्हा पुन्हा,होण्या ओबीसी जनगणना!फ अशी ओबीसींना ओबीसी आर्त हाक मारत आहे. कारण ओबीसी जनगणना करण्यासाठी घाबरणारा आणि ओबीसींचा मंडल आयोग लागू करणारे सरकार पाडणारा यांचा डीएनए सारखाच आहे.

**अनुज हुलके**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# सत्यशोधक विचाराच्या प्रभावातून डॉ भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या कार्याची वाटचाल-डॉ अशोक चोपडे

शिक्षण महर्षी डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी केलेले कार्य व त्यामागील प्रेरणा खऱ्या अर्थाने सत्यशोधकी विचाराची आणि महात्मा फुलेंची प्रेरणा असून सत्यशोधक चळवळीच्या पावलावर पाऊल ठेवून आयुष्यभर डॉ भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी कार्याची वाटचाल केलेली दिसते, असे प्रतिपादन सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक डॉ. अशोक चोपडे यांनी केले. भाऊ मदनकर स्मृतिप्रित्यर्थ विदर्भ साहित्य संघ अर्पण सभागृहात दिनांक २३ मार्च रोजी मसत्यशोधक डॉ भाऊसाहेब पंजाबराव देशमुखफ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . याप्रसंगी गांधी का मरत नाही या विख्यात ग्रंथाचे लेखक मा. चंद्रकांत वानखेडे अध्यक्ष होते. तर कार्यक्रमाचे आयोजन सत्यशोधक समाज नवउन्मेशन साहित्य सभा आणि विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. भूमिका बाबा बिडकर यांनी मांडली. संचलन समीक्षा गणेशे यांनी केले तर आभार श्रीरंग मदनकर यांनी मानले.

याप्रसंगी बोलताना डॉ. चोपडे म्हणाले की डॉ पंजाबराव देशमुख यांचे कार्य नेत्र दीपवण–ारे होते. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी शैक्षणिक संस्थांचे जाळे विणल्यामुळे बहुजन सम ाजाचे मोठ्या प्रमाणात शिक्षण होऊ शकले. यामागे महात्मा फुले यांच्या शैक्षणिक दृष्किोनाचा मोठा वारसा पंजाबराव देशमुख यांना लाभलेला होता. त्याचप्रमाणे सत्यशोधकांनी गावोगावी जाऊन ज्या पद्धतीने शैक्षणिक प्रबोधन केले आणि शिक्षणाची वाटचाल होण्यासाठी बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार प्रचार केला आणि संस्था उभारून जाळे निर्माण केले त्या विचाराच्या प्रभावातून पंजाबराव देशमुख यांनी हा शैक्षणिक क्रांतीचा प्रवाह विदर्भामध्ये सुरू केला.

शिवाजी शिक्षण संस्थेचे विदर्भात सर्वदूर जाळे विणले असून २०० पेक्षा जास्त शाळा आणि महाविद्यालये त्यांनी उभे करुन वेगवेगळ्या अभ्यासक्रमाच्या शाळा महाविद्यालये स्थापन केलेली आहेत. हे सर्वविदित आहेच परंतु त्यांच्या एकंदरीत जडणघडणीमध्ये सत्यशोधक विचार आणि सत्यशोधक चळवळीतील वेगवेगळ्या लोकांशी आलेला त्यांचा संपर्क,संवाद, समन्वय, आणि त्या माध्यमातून वेगवेगळ्या मराठा परीषदांमध्ये त्यांचा सहभाग सत्यशोधकी भूमिका दृढ करतात.पुढे ते काँग्रेसमध्ये गेल्यानंतरही सत्यशोधक चळवळीचा विचार त्यांनी काँग्रेसमध्ये काम करत असताना आपल्या कार्याच्या मुळाशी ठेवून वाटचाल केली त्यामुळे पंजाबराव देशमुख हे खऱ्या अर्थाने सत्यशोधक होते हेच म्हणावे लागते. डॉ. पंजाबराव देशम ुख विलायतेतून पीएचडी घेऊन आले तेंव्हा त्यांचा पहिला जंगी सत्कार सत्यशोधकांनी केल्याचा संदर्भ त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. त्यासोबतच १९२५ ला सत्यशोधक दिनकरराव जवळकर यांचे मदेशाचे दुष्मनफया पुस्तकाने मोठा गदारोळ उडाला होता.



त्यामुळे टिळक– चिपळूणकर पंथी आणि सत्यशोधक यांच्यात खटके उडायला लागले. टोकाचे आरोप होऊ लागले. सत्यशोधक जलशांमधून विषमतावादी, शोषक पुरोहितशाहीच्या विरो–धात प्रबोधनाने गती पकडली. यातच सत्यशोधक जलसाकार गुलाबराव नायगावकर आणि अनेक सत्यशोधकावर केसेस टाकल्या गेल्या. भाऊसाहेब देशमुख यांनी अमरावती मध्ये नुकतीच वकिलीची प्रॅक्टीस सुरू केली होती. ते नवीन असल्यामुळे त्यांच्याकडे तोपर्यंत कोणतीही केस आलेली नव्हती. प्रस्थापित वकील सत्यशोधकांची केस घ्यायला तयार नव्हते. त्याम ुळे सत्यशोधकांची पहिलीच केस भाऊसाहेब देशमुख यांच्याकडे आली. बॅरिस्टर भाऊसाहेब देशम ुख पहिलीच केस असुनही जिंकले. त्यामुळे त्यांचे नाव सर्वत्र पसरले. ही अत्यंत महत्त्वाची माहिती डॉ. चोपडे यांनी आपल्या व्याख्यानातून मांडली.

डॉ पंजाबराव देशमुख यांनी संसदेत मांडलेले देवस्थान बिल असो अथवा शेतीसंबंधीच्या सु–धारणा त्यांनी स्थापन केलेला शेतकरी संघ अथवा सत्यशोधक ब्राह्मणेतर परिषदांमध्ये त्यांचा अस–लेला सहभाग ही त्यांची एकंदरीत वाटचाल सत्यशोधक विचाराच्या प्रभावातून झालेली दिसते. त्यामुळे आज त्यांच्या कार्याचा विचार करत असताना त्या कार्याची आजही किती उपयोगिता आहे, याची जाणीव ठेवणे अगत्याचे आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केलेले शैक्षणिक कार्य आणि त्यामधून लाभान्वीत झालेले अनेक मान्यवर स्थिरस्थावर झालेले असून त्यांनी आपापले जीवन फुलविले आहे. डॉ पंजाबराव देशमुख यांचा हेतू सफल झालेला आहे. परंतु त्यांनी आपलं जीवन फुलवलं तसंच हा विचार पसरवण्यासाठी आणि या विच–ाराचा प्रचार प्रसार करण्यासाठी त्यांनी मोठे योगदान देण्याची गरज प्रतिपादन प्रतिपादन केली. त्यादृष्टीने त्यांचे चरित्रात्मक लेखन आणि त्यांच्या एकंदरीत कार्याचा आणि कृतीचा आलेख समाजापर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने विविध स्तरावर वेगवेगळ्या लोकांनी काम करण्याची गरज प्रतिपादन केली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म ा. चंद्रकांतदादा वानखेडे, सुप्रसिद्ध जनवादी पत्रकार,तथा शेतकरी नेते यांनी देखील भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या कार्याबद्दल विवेचन केले. ते म्हणाले,भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांचे कार्य शेतकऱ्यांना केंद्रीभूत ठेवून केले. शेतकरी आणि शेती – कृषी विकसित करून चांगलं जीवन जगता यावे म्हणून त्यांनी अनेक प्रकारचे प्रयोग केले. त्याचबरोबर त्यांनी शिक्षण आणि शेतीचा संबंध जोडून जोपर्यंत शेती आणि शिक्षण हे पुढे जाणार नाही, समाज बलशाली बनणार नाही,आणि असा दुबळा बनलेला समाज खऱ्या अर्थाने विकास पावणार नाही. शिक्षणाशिवाय आणि कृषी विकास याशिवाय दुबळा झालेला समाज हा राष्ट्र हिताचा विचार व्यर्थ ठरेल. म्हणून डॉ पंजाबराव देशमुख यांनी या दोन्ही गोष्टींवर त्याशिवाय सहकार क्षेत्रात आणि आणि ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले त्यांच्या कार्याचा वारसा संस्थात्मक रूपाने त्यांनी स्थापन केलेल्या वेगवेगळ्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या लोकांनी पुढे नेण्याची अपेक्षा होती. परंतु ते होऊ शकलेले नाही, ही खंत असली तरी अजूनही त्यांच्या कार्याला सर्व मिळून पुढे नेण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. अशा प्रकारे त्यांनी अध्यक्षीय भाषण करत असताना आजच्या या विषयावर महत्त्वपूर्ण व्याख्यान झाले त्या व्याख्यानाचे महत्त्व देखील समजावून सांगितले. आर एस एस आणि भाजपचा ढोंगीपणा उदाहरणासहित, पुराव्यासह उघडा पाडला.

यावेळी दिवंगत भाऊ मदनकर यांच्या कार्याविषयी माहिती मिरा मदनकर यांनी दिली. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते आणि सर्वांनी मिळून अशा प्रकारचे उपक्रम राबवले तर बहुजन सम ाजातील वेगवेगळ्या महापुरुषांनी केलेले काम समाजापर्यंत पोहोचेल आणि समाजाला प्रेरणा मिळेल. आजपर्यंत दुर्लक्षित असलेल्या महापुरुषांचे कार्य खऱ्या अर्थाने समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी अशा कार्यक्रमाची आवश्यकता प्रतिपादन केली. सर्व उपस्थित मान्यवरांनी हातात हात घालून हे कार्य पुढे नेण्याचे मान्य केले.

मा नागेश चौधरी,प्रा प्रभाकर पावडे, प्रा. अरविंद माळी, संजय शेंडे, विनोद उलिपवार, विजय बाभूळकर, सुधाताई बामनपल्लीवार, कपिल थुटे , टेमराज माले, संजय नरखेडकर, सुरेंद्र बुराडे , इंद्रपाल जौंजाळकर, स्वप्नील फुसे, देविदास लाखे, राजेंद्र डफफ, रंजना कोल्हे, गृहीत वरवाडे, सुरेश सांभारे, माधुरी सेलोकर, नेहा रुमाले,सबिया खान, खुशाल बावणे, प्रशांत तांबे, सुरेश मानमोडे, विभूषण महाले, शरद जयपुरकर, सुनील जुमडे, किरण भुयार, हरिकिशन हटवार, पांडुरंग काकडे, यशवंत पाटील, उत्तम चव्हाण, सुधाकर लोखंडे, राजू बोचरे, हेमराज बनशिंगे, प्रकाश काळबांडे, कल्याण हिरेखन, दुर्गा बाभुळकर, निलेश पाटील, सोनाली मरघडे, छाया कुरटकर, छाया वानखेडे, राजकुमार गणेकर, दीपक नारनवरे, संजय भुरे, चेतन कामडी, ऋषिकांत लोखंडे, अनुज हुलके उपस्थित होते.

# मंडळ अधिकाऱ्याविरोधात जामीनपात्र अटक वॉरंट

गोंदिया : मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाद्वारे जारी निर्देशांचे निगरगट्टपणे उल्लंघन करणे जिल्ह्यातील कुडवा येथील मंडळ अधिकारी. एच. एम. बोरकर यांच्या अंगलट आले. न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी यांनी ही बाब गंभीरतेने घेऊन बोरकर यांच्याविरोधात ५० हजार रुपयांचा जामीनपात्र अटक वॉरंट जारी केला आणि त्यांना येत्या ३० मार्च रोजी संबंधित प्रकरणावरील सुनावणीला प्रत्यक्ष हजर राहण्याचा आदेश दिला.

एका वादग्रस्त फेरफारची चौकशी करताना बोरकर

बेशिस्तपणे वागल्या. त्यामुळे न्यायालयाने त्यांना निलंबनासह विभागीय चौकशीकरिता पात्र ठरवले. परंतु, त्यापूर्वी सुनावणीची

संधी देण्यासाठी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून १६ मार्च रोजी न्यायालयात हजर होण्यास सांगितले होते. परंतु, त्या न्यायालयात हजर झाल्या नाही. तसेच, त्यांनी न्यायालयाची नोटीस स्वीकारली नाही व सरकारी वकिलाच्या संदेशालाही प्रतिसाद दिला नाही. ही अवमानजनक कृती असल्याम ुळे न्यायालयाने बोरकर यांना फटकारून अजामीनपात्र अटक वॉरंट बजावण्याचा विचार केला होता. परंतु, बोरकर यांची ही पहिलीचं चूक असल्यामुळे त्यांच्याविरोधात जामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आला.

**'तो' आदेश रद्द**

जवळील फुलचूर येथील १.५६ हेक्टर शेतजमिनीवर गुलशन अडवानी व इतर चौघांच्या नावाची नोंद घे घेणारा १७ १७ जुलै २००४ ०४ रोजीचा रोजीचा फ ेरफार गोंदिया जिल्हाधिकाऱ्यांनी बोरकर यांच्या वादग्रस्त चौकशी अहवालाच्या आधारावर १३ ऑक्टोबर २०२३ रोजी रद्द केला होता. ही कार्रवाई करताना अडवानी व इतरांना सुनावणीची संधीच दिली गेली नव्हती. परिणामी, त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने ती याचिका मंजूर करून जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश रद्द केला. तसेच, अडवानी व इतरांना सुनावणीची संधी देऊन फेरफारविरोधातील तक्रारीवर नव्याने निर्णय घेण्यास सांगितले.

# अर्जुनी/मोर येथे पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**अर्जुनी/मोर :** अर्जुनी/मोर, सिरेगाव व खांबी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांवर कार्यरत असलेल्या सुमारे ५० कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात पाणी पुरवठा कामगार संघटना अर्जुनी/मोर यांच्या वतीने जिल्हा परिषद अध्यक्ष, गोंदिया यांना निवेदन देण्यात आले आहे.

कर्मचाऱ्यांच्या मते, अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा योजनेत काम करत असूनही त्यांना नियमित मानधन मिळत नाही. याबाबत न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल दिल्यानंतरही थकीत मानधनाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. तसेच सेवा जेष्ठता यादी तयार करून देणे, किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करणे आणि न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.



# कोण आहेत ज्ञानेश महाराव?

महाराष्ट्रातील असंख्य तरुणांची जडण घडण करण्यात अनेक संशोधक, विचारवंताप्रमाणे चित्रलेखाचे निवृत्त संपादक ज्ञानेश महाराव यांचा सिंहाचा वाटा आहे. मी स्वतः १९९९ सालापासून चित्रलेखाचा नियमित वाचक आहे. गेल्या तीस वर्षातील महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय घडामोडींमध्ये चित्रले–खाचा अर्थात ज्ञानेश महाराव यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

चित्रलेखाने महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक कार्य केलेले आहे. याचे श्रेय ज्ञानेश महाराव यांना जाते. अभ्यासूवृत्ती, निर्भीडपणा, प्रामाणिकपणा, ज्या त्या वेळेस योग्य भूमिका घेण्याची हिम्मत, भाषेतील सत्यनिष्ठा आणि प्रखरता हे त्यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये आहेत. महाराव म्हणजे करारी बाणा आणि लेखणीचा राणा आ–हेत. लेन प्रकरण २००३ साली घडले, कोंडदेव पुतळा प्रकरण २०१० साली घडले, पुरंदरे पुरस्कार प्रकरण २०१६ साली घडले, कोरेगाव भीमा प्रकरण २०१८ साली घडले, महाराव यांनी त्याच वेळेस भूमिका घेतली, समोर प्रकरणं घडत असताना ते शांतपणे बघत बसले नाहीत.

आज आपल्या देशामध्ये जे काही प्रामाणिक आणि निर्भीड पत्रकार आहेत, त्यापैकी ज्ञानेश महाराव हे एक आहेत. अंधश्रद्धा, प्रतिगामीवृत्ती याविरुद्ध ते लेखणीचे शस्त्र करून अनेक वर्षापासून लढत आहेत. कदाचित त्यांना कल्पनाही नसेल इतके विद्यार्थी त्यांच्या मुक्त विद्यापीठातून तयार झालेले आहेत. आता ते जगभरातील विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारितेच्या म ाध्यमातून प्रबोधन करत असताना त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले पण ते निराश झाले नाहीत, आणि विशेषतः आपल्यावर आलेल्या संकटाचे त्यांनी कधी खासगी आणि सार्वजनिक जीवनात भांडवलदेखील केले नाही.

ज्ञानेश महाराव हे जसे उत्तम पत्रकार आहेत तसेच ते उत्तम नाटककार आहेत, त्यांनी मजिंकू या दाही दिशाफ, मघालीन लोटांगणफ आणि मसंत तुकारामफ (संगीत) ही तीन नाटके मराठी जनांना दिली. मजिंकू या दाही दिशाफ च्या माध्यमातून शिवराय ते फुले, शाहू, आंबेडकर ही विचारधारा जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. विनोदाबरोबर प्रबोधन त्यांनी केले. संत तुकाराम महाराजांची प्रेमळ, मायाळू तशीच क्रांतिकारक प्रतिमा संगीत नाटकातून त्यांनी मांडली. त्या नाटकात त्यांनी तुंबाजीची अफ लातून भूमिका केलेली आहे. हजरजबाबीपणा हे त्यांच्या भूमिकेचे वैशिष्ट्य आहे. यातून त्यांनी बुवाबाजीवर कडाडून प्रहार केलेला आहे. ते जसे गंभीरपणे लिहितात, तसेच विनोदातूनदेखील प्रबोधन करतात.

ते उत्तम गायकदेखील आहेत. शास्त्रीय संगीतामध्ये ते पारंगत आहेत. त्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले आहे. ते बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. तरीदेखील अतिव ध्येयवादातून आणि कर्तृत्वातून येणारा अहंकार त्यांच्याकडे नाही, महारावांना खोटारडेपणा अजिबात आवडत नाही. हे त्यांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. महाराव हे योग्य वेळी अचूक भूमिका घेणारे पत्रकार आ–हेत. कोणाला काय वाटेल म्हणून सत्य लपवून असत्याची पाठराखण त्यांनी कधी केली नाही.

जेम्स लेन प्रकरणाच्या वेळेस अनेक विचारवंत, पत्रकार, लेखक, संशोधक मूग गिळून गप्प बसले होते. कांही पत्रकारांनी तर विकृत लोकांची बाजू घेतली होती. हा संवेदनशील विषय आहे, म्हणून खासगीत कुजबुज करून लेनवाद्यांपुढे गर्भगळीत झाले होते. अशा काळात ङ्गशिवरायांच्या बदनामीचे विदेशी पुस्तक, स्वदेशी मस्तकङ्ग अशा मथळ्याखाली लेख लिहून लेनवाद्यांना चव्हाट्यावर आणून शिवरायांचा सन्मान करण्याचे ऐतिहासिक काम महारावांनी केले. लेनवाद्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून त्यांची विषारी तोंड बंद केली. २००५ साली लेनवाद्यांच्या आश्रयदात्यांना दोन वेळा सत्तेपासून रोखण्याचे श्रेय ज्ञानेश महाराव यांना द्यावे लागेल. या घटनेने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि संशोधनाच्या क्षेत्रात दूरगामी परिणाम झाले. तरुणांमध्ये जाण, भान आणि ज्ञान आले, याचा पाया एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात महारावांनी घातला, असे म्हणावे लागेल.

२००५ साली महाराष्ट्रात काँग्रेस–राष्ट्रवादीची सत्ता येण्याची सुतराम शक्यता नव्हती. भाजप सेनेच्या आक्रमणापुढे त्यांनी माना टाकल्या होत्या. लेनप्रकरणी वाजपेयी–अडवाणी–ठाकरे यांच्या भूमिकेमुळे महाराष्ट्र संतापला होता. ज्ञानेश महाराव यांनी त्या सर्वांची लेखनीतून आणि सभांमधून चिरफ ाड केली. त्यांची या विषयावरील बिंदू चौक (कोल्हापूर) येथील सभा विशेषतः खूप गाजली.

सुरुवातीला भांडारकरी लोकांच्या बाजूने उभे असण–ारे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील हे महाराव यांच्या सत्यवादी भूमिकेमुळे जागे झाले आणि ते महारावांची भूमिका मांडू लागले. त्यावेळेस महाराव यांनी आर. आर. पाटील यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांना विषय समजावून सांगितला, अनेक संदर्भ दिले. साहजिकच याचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला २००५ च्या विधानसभा निवडणुकीत खूप झाला. जाणारी सत्ता महाराव यांच्या लेखणीमुळे त्यांना मिळाली. पण प्रामाणिक पुरोगामी संपादक असणाऱ्या महाराव यांची बाजू घ्यावी, त्यांना राज्यसभेवर किंवा विधानपरिषदेवर पाठवावे, असे आघाडीवाल्यांना वाटत नाही. कदाचित कामाच्या व्यापामुळे ते विसरले असतील.

लेनचे समर्थन करणाऱ्या कुम ार केतकरांना काँग्रेसने खासदार केले. शिवरायांचा सन्मान करून राष्ट्रवादी काँग्रेसला व काँग्रेसला सत्तेपर्यंत पोचविण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या महारावांना काँग्रेस–राष्ट्रवादीने काय दिले? जीवावर उदार होऊन पुरोगामी भूमिका बाजावणाऱ्या लेखक, पत्रकार, विचारवंत महाराव यांच्याप्रती काँग्रेस–राष्ट्रवादीची भूमिका कृतघ्नपणाची आहे. नवसरंजामदार सत्तेतील मराठा नेत्यांना सत्ता गेली की शिव, फुले, शाहू, आंबेडकर, पुरोगामी चळवळी आठवतात, आणि सत्ता आली की मुलगा, मुलगी, नातू, जावई, व्याही आठवतात. भाजपवाले त्यांच्या विकृत व्यक्तीच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात. उदाहरणार्थ पुरंदरे. काँग्रेस–राष्ट्रवादीवाले सुसंस्कृत विचारवंताच्यादेखील पाठीशी उभे राहत नाहीत. उदाहरणार्थ महाराव.

दादोजी कोंडदेव पुतळा हटवावा प्रकरण, राम गणेश गडकरी पुतळा प्रकरण, बाबासाहेब पुरंदरे महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रकरण, कोरेगाव भीमा दंगल प्रकरण इत्यादी विषय महारावांनी योग्य पद्धतीने मांडले, त्यामुळे आतापर्यंत महाराष्ट्र दंगलग्रस्त होण्यापासून वाचलेला आहे. महाराव सतत भूमिका घेत असतात.

पुरंदरे विरोधी "शिवसन्मान जागर परिषदां"वेळी ज्ञानेश महाराव, डॉ.जितेंद्र आव्हाड, प्रा.प्रतिमा परदेशी आणि सदर लेखाचे लेखक यांनी कोणत्याही स्वरूपाचे मानधन किंवा प्रवास खर्च न घेता, महाराष्ट्रभर सुमारे पन्नास शिवसन्मान जागर परिषदा घेतल्या.

ज्ञानेश महाराव यांनी तर त्यांना मुंबईत मिळालेल्या एका पुरस्काराची रक्कम कोल्हापूर येथील शिवसन्मान जागर परिषदेच्या संयोजकाकडे सुपूर्त केली. हजारो रुपये मानधन घेऊन संयोजकांना छळणारे वक्ते कमी नाहीत, पण स्वतः च्या खिशा–तील पैसे संयोजकांना देणारा वक्ता कधी आपण पाहिला आहे का?. त्या वक्त्याचे नाव आहे ज्ञानेश महाराव!

कोरेगाव भीमा प्रकरणाच्या माध्यमातून "मराठा विरुद्ध बौद्ध" अशी दंगल घडविण्याचा प्रतिगाम्यांचा डाव ज्ञानेश महाराव यांनी लेखमालेतून हाणून पाडला. त्यावेळेस खूप कठीण परिस्थिती होती. भूमिका घेण्यास अनेक लोक कचरत होते. पण महारावांनी कोणाचाही मुलाहिजा न बाळगता वास्तववादी भूमिका मांडली. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठा अनर्थ टळला. आजच्या काळात शब्द हेच शस्त्र आहे, हे ओळखून मराठी भाषेची आणि तुकोबा–ज्योतिबा यांच्या विचारांची इमानेइतबारे सेवा करणारे महाराव हे भाषाप्रभू आहेत.

ज्ञानेश महाराव हे केवळ पत्रकार नाहीत, तर ते उत्तम नाटककार आहेत. त्यांनी अनेक नाटकं लिहिली. त्या नाटकांचे शेकडो प्रयोग झाले. त्या नाटकात त्यांनी भूमिका केल्या. संत तुकाराम महाराज नाटकातील तुंबाजीची भूमिका त्यांनी अफलातून केली. ते उत्तम शाहीरदेखील आहेत. ते उत्तम लेखक आहेत. समाजजागृती करणारी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. ते उत्तम गायक आहेत. त्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले आहे. ते उत्तम वक्ते आहेत. त्यांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरदेखील अनेक सभा गाजवलेल्या आहेत. दुबई येथे प्रतिवर्षी होणाऱ्या शिवजयंतीसाठी ते प्रमुख वक्ते होते.

ज्ञानेश महारावांच्या परखडपणामागे कोणाबद्दल असूया नाही, कोणाबद्दलही द्वेष नाही, आत एक बाहेर एक अशी त्यांची वृत्ती नाही, लॉबिंग करून कोणाला छळण्याची क्रूर मनोवृत्ती नाही, आपल्या वैचारिक विरोधकांशीही अत्यंत सहृदय अंतकरणाने सुसंवाद करणारे अत्यंत मानवता–वादी पत्रकार, लेखक, नाटककार, संगीततज्ञ, प्रभावी वक्ते आणि कलाकार म्हणजे ज्ञानेश महाराव आहेत. त्यांनी हिंदू धर्मात सु–धारणा घडवून आणण्यासाठी मोठे प्रबोधन केलेले आहे. धर्मात चिकित्सेला वाव असला तरच धर्म लोककल्याणकारी होतो, तरच धर्म वृद्धिंगत होतो. महाराव यांच्या प्रबोधनामुळे हिंदू धर्माचे कल्याणच झालेले आहे, नुकसान झालेले नाही. महाराव हे हिंदू धर्माचे शत्रू नाहीत, तर ते धर्माचे सुधारणावादी आहेत.

वैचारिक मतभिन्नता असू शकते, ती कुटुंबातदेखील असते, समाजात तर असणारच, वैचारिक मतभिन्नतेचे भारतीय संविधानानेदेखील स्वागतच केलेले आहे. एखाद्या व्यक्तीचे वैचारिक मत मान्य नसेल तर त्याचा प्रतिवाद करण्याचीदेखील एक शास्त्रशुद्ध पद्धती भारतीय लोकशाहीमध्ये आहे, परंतु आपले मत मान्य नसणाऱ्याच्या घरात किंवा कार्यालयात घुसून त्याच्या मनामध्ये दहशत निर्माण करणे, दमदाटी करणे हे मात्र झुंडशाहीचे अर्थात हुकूमशाहीचे लक्षण आहे.

ज्ञानेश महाराव यांनी संपूर्ण आयुष्य संशोधन, लेखन, वाचन, प्रबोधन, पत्रकारिता, नाट्यलेखन, अभिनय, गायन यासाठी समर्पित केलेले आहे. त्यांनी कायम लोकशाही संविधानिक मूल्ये जप–लेली आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक पिढ्या घडवल्या. त्यांच्या कामाचा पूर्ण फायदा महाविकास आघाडीला झालेला आहे, परंतु परवा त्यांना एकट्याला गाठून धर्मांधांनी त्यांना दमदाटी केली, एकट्याला गाठून दमदाटी करण्यात शौर्य नसते, ज्ञानेश महाराव अशा दमदाटीला घाबरणारे नाहीत. ते निराश होऊन घरात बसणारेदेखील नाहीत, परंतु खंत याची वाटली की महारावामुळे ज्या राजकीय पक्षांना खूप मोठा फायदा झाला, ते मात्र त्यांच्या बाजूने पुढे आले नाहीत.

विकृत, शिवद्रोही गिरीश कुबेरला संभाजी ब्रिगेडने काळे फासल्यावर निषेध करणाऱ्या एकानेही पुढे येऊन महाराव सरांना झालेल्या दमदाटीचा एका शब्दानेदेखील निषेध केला नाही! कृतघ्न कुठले!

**– डॉ श्रीमंत कोकाटे**

# पुजारीटोला मत्स्यपालन सहकारी संस्थेत कोट्यवधींची अफरातफर

## करा संचालकांवर गुन्हा दाखल; नॉयलान जाळे अनुदान वाटप प्रकरण

**गोंदिया :-** कोटरा येथील पुजारीटोला मत्स्यपालन सहकारी संस्थेत लाभार्थ्यांना नॉयलान जाळे अनुदान वाटपात एक कोटी १७ लाख ९५ हजार ७२० रुपयांची अफरातफर झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी राजेश केशवराव शहारे (वय ५२) यांच्या तक्रारीवरून सालेकसा पोलिसांनी मंगळवारी (ता. २४) संस्थेच्या अकरा संचालकांवर गुन्हा दाखल केला आहे.



कोटरा येथील पुजारीटोला मत्स्यपालन सहकारी संस्थेच्या संचालकांनी संस्थेद्वारे नॉयलान जाळे अनुदान वाटप लाभार्थी निवड प्रक्रियेचे पालन केले नाही. अनुदान वाटप केले किंवा कसे? याचे मूळ प्रमाणित प्रमाणके रेकार्डवर उपलब्ध नाही. त्यामुळे संपूर्ण अनुदानाची रक्कम संचालकांनी परस्पर उचलून अफरातफर केल्याचे दिसून येत आहे. सदर संस्थेत मासेमार मजुरीकरिता एकूण ७० लाख ६१ हजार ७७० रुपये वाटप केले, असे रेकार्डवर नमूद आहे. परंतु, मजुरी वाटप केल्याचे मूळ प्रमाणके रेकार्डवर दिसून येत नाही. एकूण वाटप रक्कम ३४ लाख २३ हजार ९५० रुपये कोणाला दिली. याबाबत पुरावे, प्रमाणके, खाते विवरण रेकार्डवर नाही. रक्कम वाटप झालेल्या व्यक्तीची सही किंवा साक्ष रेकार्डवर दिसून येत नाही.

सदर संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १२ लाख २५ हजार रुपये मानधनापोटी वाटप केल्याचे रेकार्डवर नमूद आहे. परंतु, सदर मानधन वाटप केल्याचे मूळ प्रमाणके रेकार्डवर उपलब्ध नाहीत. त्यामुळे संचालकांनी कट रचून चुकीचे ताळेबंद पत्रक तयार करून एकूण एक कोटी १७ लाख ९५ हजार ७२० रुपयांची अफरातफर केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी संचालकांवर गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस निरीक्षक भूषण बुराडे करीत आहेत.

### गुन्हा दाखल झालेल्या संचालकांची नावे

**विनोद मंगरू कागदीमेश्राम (वय ६०, रा. कोटरा, ता. सालेकसा), धनराज परसराम शेंडे (वय ४५, रा. लोहारा, ता. देवरी), संजय कागदीमेश्राम (रा. कोटरा), गुजोबाजी बारूक मेश्राम (वय ७८, रा. कोटरा), आत्माराम भुते (वय ५५, रा. कोटरा), देवेंद्र हरिश्चंद्र कोटांगले (रा. कोटरा), भीमराज मरस्कोल्हे (रा. सिंगाटोला कोटरा), प्रेमलाल मोतीराम मेश्राम (रा. हेटीटोला), रघुनाथ बिसन मोरदेवे (रा. चिचटोला), पुरुषोत्तम चैतराम ढवरे (रा. सोनारटोला, ता. देवरी) व एक महिला (रा. मुल्ला, ता. देवरी) अशी गुन्हा दाखल झालेल्या संचालकांची नावे आहेत.**

# जीर्ण पुलावरून जीवघेणा प्रवास;जुने पूल जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर

**गोंदिया :-** जिल्ह्यातील दोन विधानसभा मतदार संघांना जोडणारा गोरेगाव तालुक्यातील पांगोली नदीवरील पूल पूर्णपणे जीर्ण झाला आहे. त्यामुळे हा पूल कधीही धराशाही होण्याच्या मार्गावर आहे. असे असताना या पुलावरून दरदिवशी शेकडो वाहनांची वर्दळ सुरू आहे. मात्र याकडे संबंधीत प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. मात्र, दोन्ही क्षेत्रांच्या लोकप्रतिनिधींकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी या जीर्ण पुलावरून परिसरातील नागरिकांचा जीवघेणा प्रवास सुरू आहे. या पुलासाठी दोनपैकी एखादा लोकप्रतिनिधी निधी आणेल अशी अपेक्षा नागरिकांना होती मात्र ती हवेतच विरली.



जिल्ह्यात अनेक मार्गावर विकासकामे होत असली तरी प्रत्यक्षात जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्ये व त्यावरील कठडेरहित पूल नागरिकांच्या जीवावर उठले आहे तिरोडा, देवरी, सड़क अर्जुनी आदी सर्व तालुक्यातील तालुका ते जिल्हा मुख्यालयाला जोडणाऱ्या रस्त्यांवर असेच काही पूल मृत्यूला आमंत्रण देत आहेत. त्यापैकीच एक गोरेगाव-म्हसगाव या जिल्हा मार्गावरील पांगोली नदीवरील जीर्ण पूल आहे.

तालुका मुख्यालयापासून अवघ्या दीड किमी अंतरावर घोटी ते म्हसगावदरम्यान पांगोली नदीवर ५० वर्षांपूर्वी लहान पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. तेव्हापासून या पुलावरून वाहतूक सुरू आहे. बांधकाम जुने झाले असताना पुलावरून वाढलेली वाहनांची वर्दळ पाहता नव्याने पुलाचे बांधकाम होणे गरजेचे आहे. मात्र, काही महिन्यांपूर्वी प्रधानमंत्री सडक योजनेंतर्गत पूल वगळता दोन्ही बाजूंचे रस्त्यांचे बांधकाम करण्यात आले असताना जीर्ण पुलाच्या दुरुस्तीसाठी कोणतीही पावले उचलण्यात आली नाहीत. अनेक अपघात व पुराच्या पाण्याने या पुलावरील कठडे बेपत्ता झाले आहे. तर पुलाच्या बांधकामातील सळाखी आता बाहेर निघू लागल्या आहे. असे असले तरी संबंधित विभागाकडून याठिकाणी कोणत्याही प्रकारचे दिशादर्शक फलक अथवा सूचना या पुलावर लावण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या मार्गावरील ये-जा करणाऱ्यांसाठी हा पूल कर्दनकाळ ठरू पाहत आहे.

# नियोजित बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश



**गोंदिया :-** तिरोडा येथे होऊ घातलेल्या बालविवाहाची गोपनीय माहिती मिळताच जिल्हा प्रशासनाने तत्काळ कारवाई करून हा विवाह रोखण्यात यश मिळिवले.

प्राप्त जिल्हाधिकारी प्रजित नायर, जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी कीर्ती कुमार कटरे व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनिकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन, इंडियन सोशल वेल्फेअर सोसायटी गोंदिया तसेच दामिनी पथक यांची संयुक्त टीम तयार करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार, संबंधित मुलगा व मुलीचे जन्म प्रमाणपत्र तिरोडा नगरपरिषदेकडून करण्यात आले. त्यानुसार मुलीचे वय बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ नुसार विवाहासाठी अपुरे असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर टीमने तिरोडा येथे भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. पर्यवेक्षिका,अंगणवाडी सेविका, नगरसेवक अनिकेत कटरे व वॉर्ड बाल संरक्षण समितीच्या सदस्यांची बैठक घेऊन नियोजित विवाहाबाबत माहिती देण्यात आली. ४ एप्रिल रोजी मंडप पूजन व हळदीचा कार्यक्रम, तर ५ एप्रिल रोजी सकाळी ११:३० वाजता विवाह होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर दामिनी पथक, महिला व बाल विकास विभाग आणि इंडियन सोशल वेल्फेअर टीमने सोसायटीच्या नवरदेव-नवरी तसेच त्यांच्या पालक व नातेवाइकांशी चर्चा करून बालविवाहाचे कायदेशीर परिणाम आणि दुष्परिणाम समजावून सांगितले. तय पूर्ण होईपर्यंत विवाह न करण्याचे लेखी हमीपत्र पालक व संबंधितांकडून घेण्यात आले.

बालविवाह मुक्त भारतफ मबालविवाह मुक्त महाराष्ट्रफ आणि मबालविवाह मुक्त गोंदियाफ या अभियानांतर्गत ही कारवाई करण्यात आली. नागरिकांना अशा घटना आढळल्यास अंगणवाडी सेविका, जवळचे पोलिस ठाणे, जिल्हा बाल संरक्षण कक्ष किंवा चाइल्ड हेल्पलाइन (टोल फ्री क्रमांक १०९८) वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे यांच्या नेतृत्वाखाली ही संपूर्ण कार्यवाही पार पडली. सामाजिक कार्यकर्त्या मनीषा चौधरी व दीपमाला भालेराव यांनी बालिकेचे समुपदेशन केले असता, तिने पुढील शिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली. बालिकेला बालकल्याण समिती समोर सादर करून त्यानंतर तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

# जनगणनेत ओबीसीसाठी स्वतंत्र रकाना ठेवण्यात यावा

### पंचायत समितीकडून ठराव मंजूर : यूजीसी कायदा तत्काळ लागू करा

**सडक अर्जुनी: -** केंद्र सरकारने यूजीसी कायदा लागू करावा यासंदर्भात सडक अर्जुनी पंचायत समिती सभागृहात चर्चा घडवून आणण्यात आली. कायद्यामुळे मागास प्रवर्गातील विद्यार्थी व परीक्षार्थी यांना निश्चितच फायदा होणार असून, या कायद्याची या

अंमलबजावणी तत्काळ संपूर्ण महाराष्ट्र राज्यात करण्यात यावी, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सडक अर्जुनी पंचायत समितीची मासिक सभा २४ मार्चला आयोजित करण्यात आली होती. त्यात विषयपत्रिकेतील विषयानंतर अध्यक्षाच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करण्यात आली. त्या यूजीसी कायदा संपूर्ण महाराष्ट्रभर तत्काळ लागू करण्यात यावा, असे पंचायत समिती सदस्या वर्षा शहारे यांनी सुचविले. त्याला डॉ. रुकीराम वाडई यांनी अनुमोदन दिले व ठराव सर्व संमतीने मंजूर करण्यात आला. केंद्र शासनाने जनगणना २०२७ चे राजपत्र प्रसिद्ध केले असून, या प्रसिद्धी पत्रामध्ये ओबीसी प्रवर्गाचा रकाना समाविष्ट करण्यात आला नाही, यावरही सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व सदस्यांनी जनगणना करताना ओबीसी वर्गाचा स्वतंत्र रकाना ठेवण्यात यावा व त्यानंतरच जनगणनेची प्रक्रिया राबविण्यात यावी. जर ओबीसी वर्गाचा स्वतंत्र रकाना ठेवण्यात आला नाही तर सडक अर्जुनी तालुक्याचा या जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

# पोलीस बनण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले

**अर्जुनी मोर -**तालुक्यातील मोरगाव येथे घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. पोलीस बनून कुटुंबाचे नाव उज्वल करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या १९ वर्षीय पायल वामन शहारे हिचा ईटियाडोह कालव्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. तब्बल २४ तासांच्या अथक शोधानंतर तिचा मृतदेह घटनास्थळापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर मंगळवारी (ता. ३१ मार्च) सकाळी आढळून आला.तिच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शाळेच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन

### आंदोलनाला राजकीय रंग; परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दुष्परिणाम



**गोरेगाव-** येथील पीएमश्री शहीद जान्या तिम्या जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रभाकर लोंढे यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करीत कारवाईच्या मागणीला घेऊन शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी सोमवारी शाळाबंद आंदोलन पुकारले. जिल्हा प्रशासनाकडून आंदोलनाची दखल घेत जि.प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्राचार्य लोंढे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली.

प्राचार्य लोंढे यांच्यावर महाविद्यालयात आर्थिक घोळ केल्याचे आरोप करीत शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी तक्रारी केल्या. ३० डिसेंबर २०२५ रोजी शाळाबंद आंदोलन छेडण्यात आले होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत चौकशी पूर्ण करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, कारवाई होत नसल्याचे पाहून पालकांनी पुन्हा सोमवारी सकाळपासून शाळाबंद आंदोलनाला सुरुवात केली. या आंदोलनाची दखल घेत जि.प. शिक्षण विभागाकडून सायंकाळी ५ वाजेपर्यंतची वेळ मागितली होती. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सायंकाळी ६ वाजता प्राचार्य लोंढे पांना तत्काळ प्रभावाने निलंबित करीत असल्याचे पत्र जारी केले.

पत्रानुसार लोंढे यांच्या विरोधात ३० डिसेंबर २०२५ रोजीचे आंदोलन व तक्रारीची दखल घेत नेमण्यात आलेल्या चौकशी समितीकडून १९ जानेवारी रोजी अहवाल प्राप्त झाला. चौकशी अहवालात मुख्याध्यापक लोंढेविरूद्ध बहुतांश आरोप सिद्ध होत असल्याने कठोर प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली. त्या अनुषंगाने मुख्याध्यापक लोढे यांच्यावर तत्काळ प्रभावाने निलंबनाची कारवाई करण्यात येत असल्याचे नमूद आहे. जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलेल्या घा कारवाईचे शाळा व्यवस्थापन समिती व पालक वर्गाकडून स्वागत करण्यात आले आहे.माजी आमदार दिलीप बन्सोड, नगराध्यक्ष तेजराम बिसेन, राहुल चंद्रिकापुरे, सभापती पवन रहांगडाले यांनी भेटी देत आंदोलनास समर्थन दिले. त्यामुळे ऐन परिक्षेच्या काळात या आंदोलनास राजकीय वळण लागल्याची चर्चा गावकऱ्यांमध्ये आहे.

# जनगणना-२०२७ साठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण संपन्न

**गोंदिया :-** भारताच्या भविष्यातील नियोजनासाठी अत्यंत महत्वाची असलेली ङ्गजनगणना-२०२७फ आता प्रत्यक्षात सुरु होत आहे. या मोहिमेचा पहिला टप्पा, जो ङ्गघरयादी व घरगणनाफ असा आहे. तो आगामी १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्ह्यात आगामी जनगणना-२०२७ च्या पुर्वतयारीसाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. पहिल्या टप्प्याच्या प्रशिक्षणाकरीता गोंदिया जिल्ह्यातील सर्व जनगणना अधिकारी, चार्ज जनगणना अधिकारी (सर्व तहसिलदार, सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपंचायत) तसेच अतिरिक्त चार्ज जनगणना अधिकारी, जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालय, नगर परिषद/नगरपंचायत कार्यालयातील जनगणना लिपिक व तांत्रिक सहाय्यक यांचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे २३ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत तीन दिवसीय विशेष

सदर प्रशिक्षणाकरीता जनगणना संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई मार्फत सहायक संचालक जोगेंद्र तामगाडगे, तसेच चेतन गायधने व जितेंद्र कुमार District Co-ordinator for G$ondia District जनगणना-२०२७, या अधिकाऱ्यांना जनगणना-२०२७ च्या तयारीच्या उपक्रमांचा भाग म्हणून गोंदिया जिल्ह्याकरीता प्रशिक्षण देण्यासंदर्भात नेमले आहे. या अधिकाऱ्यांनी तीन दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये पहिल्या टप्प्यामध्ये करावयाचे कार्य, पायाभूत स्तरापासून तर अंतिम टप्प्यापर्यंतच्या सगळ्या बाबतीत सविस्तर प्रशिक्षण दिले.

सदर प्रशिक्षणावेळी जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी प्रजित नायर, तसेच निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी या प्रशिक्षणाद्वारे गोंदिया जिल्ह्यातील सर्व नागरिकांना जनगणना-२०२७ करीता सहयोग करण्याचे आवाहन केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे जनगणना-२०२७ करीता स्वतंत्र जनगणना कक्ष स्थापन करण्यात आला आहे. जिल्ह्यातील जनगणनाविषयी महत्वाची माहिती तसेच आकडेवारी इत्यादी बाबतीत समन्वयाचे कार्य या कक्षामार्फत होणार आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी कळिवले आहे.

# नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या ई-गव्हर्नन्सची राज्यात छाप

राज्याचे द्रष्टे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कृती कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि डिजीटल सुविधांचा वापर वाढविण्यासाठी १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमही राज्यात यशस्वीपणे राबविण्यात आला. जिल्हा व विभागीय स्तरावरील विविध कार्यालये व मंत्रालयीन विभाग स्तरावर राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये सर्वोत्कृष्ट कार्यालयांची सात निकषांवर निवड करण्यात आली. यात विभागीय आयुक्त गटात नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने सर्वोत्तम कामगिरी करत राज्यात पहिला क्रमांक पटकाविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच विभागीय आयुक्त कार्यालयाचा सन्मान करण्यात आला. ई- गव्हर्नन्स सुधारणा संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या सक्षम नेतृत्वात विभागीय आयुक्त कार्यालयाने वापरकर्ता पूरक संकेतस्थळ निर्माण करून आवश्यक ते सर्व निकष पूर्ण केले व त्याची रीतसर अंमलबजावणी केली. जनतेला राज्य शासनाच्या अधिसूचित सेवांचा लाभ १ कोटींच्यावर लाभ दिला. नागरीकांच्या तक्रारींचे काल मर्यादेत निराकरण केले. ई-ऑफिसद्वारे फाईल व निपटारा प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले. केंद्र व राज्य शासनाच्या योजना व कार्यक्रमांच्या माहितीसाठी दृश्य डॅश बोर्ड तयार करण्यात आले. याद्वारे विभागातील कार्यक्षमता निरीक्षणही करण्यात आले. व्हाट्सअपस्नेही चॅट बॉट तयार करण्यात आला. वापरासाठी सुलभ असलेल्या या माध्यमाद्वारे तक्रार निवारण पोर्टल, सीएम व्हाट्सअप चॅनल, धरणे-तलावांच्या पाण्याची पातळी आदी माहिती देण्यात आली.विशेष करून आपत्ती काळात जनतेला सतर्कतेची माहिती देण्यात आली.

'ए आय' आणि 'ब्लॉक चेन' या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून भारतातील पहिले ङ्गस्मार्ट व इंटेलिजंट गाव सातनवरीफ हा प्रकल्प प्रत्यक्षात आला. इतरांसाठी प्रेरक ठरलेला हा प्रकल्प आता राज्यातील ७५ गावांमध्ये रविण्यात येत आहे. राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी जीआयएसचा वापर करून वर्धा जिल्ह्यात "इंफ्रा युनिक आयडी' तयार करण्यात आली. हा प्रकल्पही उल्लेखनीय ठरला असून राज्यात याची अंमलबजावणी सुरू आहे.

### संकेतस्थळ निकषात उत्तम कामगिरी

राज्यातील विभागीय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळ व त्यासाठी घालून दिलेल्या निकषांची उत्तम अंमलबजावणी नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने केली आहे. या अंतर्गत कार्यालयाच्या htts: //divcomnagur.maharashtra.gov.in संकेतस्थळावर पृष्ठ लोड होण्याची गती २.४ सेकंद झाली आहे त्यामुळेच ते वापरकर्ते स्नेही झाले आहे. शासनाच्या अन्य विभागांची माहिती सहजी उपलब्ध करून देत डोमेन अनुपालन चोखपणे करण्यात आले आहे. देशातील सर्व राजभाषांमध्ये या संकेतस्थळाचा मजकूर उपलब्ध करून देण्यात आला आहे. हे संकेतस्थळ सामान्य जनतेला मोबाईल उपकरण आणि वेब



ब्राऊझर वर उपलब्ध करून देण्यात आल्याने वापरकर्त्यांना सहज वापरता येते. संकेतस्थळाला भेट देणाऱ्यांची संख्याही दृष्य स्वरूपात दिसते.

हे संकेतस्थळ दिव्यांग वापकर्त्यांसाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळाच्या मालकीचा उल्लेख दर्शवताना सायबर सुरक्षेची काळजी घेण्यात आली आहे. यासंदर्भात सायबर सुरक्षा ऑडिट प्रमाणपत्रही प्राप्त झाले आहे. संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी अद्यावत करण्यात येते तसेच सर्व पुनरुत्पादित कागदपत्रे स्त्रोतांचा उल्लेख करण्यात येतो. यामध्ये दस्तऐवजांचे शीर्षक, मालक संस्था आणि प्रकाशन तारीख यांचा समावेश आहे. नागरिकांची सनद, माहितीचा अधिकार, नवीन घडामोडी व घोषणांचा समावेश आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर विभागीय संचालक कार्यालय, नागपूर जिल्हा माहिती कार्यालय आणि नागपूर महानगर पालिकेच्या समाज माध्यमांवरील अद्यावत माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### आपले सरकारच्या माध्यमातून जनतेला विविध सेवा

राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात आलेल्या २० सेवांचा लाभ विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या मार्फत जनतेला देण्यात आला. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निहित कालावधीमध्ये २० कोटी ३ लाख ४७ हजार सेवा जनतेला पुरविण्यात आल्या.सेवा प्रदानतेचा दर ९८.३२ टक्के आहे. यापैकी २१ लाख ९७ हजार ५४८ लोकांनी माहितीच्या अधिकार सेवेचा लाभ घेतला. यातील १ हजार ७८० प्रकरणे पहिल्या अपिलासाठी आले तर २१८ दुसऱ्या अपिलात प्राप्त झाले. शासनाच्या अधिसूचित सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या. या सर्व सेवा आपले सरकार पोर्टल सोबत जोडण्यात आल्या.नागरिकांच्या तक्रारींचे विहित कालमर्यादेत निराकरण करण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

### ई-ऑफिसचा प्रभावी उपयोग

विभागीय आयुक्त कार्यालयातील १६४ वापरकर्ते हे ई-ऑफिसचा अवलंब करतात. यातील १५४ वापरकर्ते हे सक्रियपणे ई-ऑफिसचा वापर करतात. १५० दिवसांच्या मोहीम काळात ई-ऑफिसद्वारे फाईलींची प्रक्रिया गतीने करून निपटारा करण्याचा दर ९३.३९ टक्के राहिला.नेहमीच्या पाच टप्प्यांवर फाईल निकाली काढण्याचा दर कमी होऊन तीन टप्प्यांवर आला. ई-ऑफिसच्या हाताळणीसाठी तांत्रिक सहाय्यकाची नेमणूक करण्यात आली. ई-ऑफिसच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

### डॅशबोर्डद्वारे माहितीचे अद्यतन व अचूकता

नागपूर विभागाने विभागीय आयुक्तांच्या मकेआरएफ मधील कार्यक्षमता निरीक्षणासाठी नवीन डॅशबोर्ड तयार केला आहे. या डॅशबोर्डची मांडणी व्हिज्युअलायझेशन कस्टम, माहितीची छाननी आणि विभाग निहाय परस्पर संवादी इंटरफेस, माहितीचे अद्यतन आणि अचूकता, भूमिका निहाय प्रवेश नियंत्रण, राज्य व केंद्र शासनाच्या महत्त्वाच्या योजना व कार्यक्रमांचा यात समावेश करण्यात आला आहे. डॅशबोर्डचा उपयोग महसुली अधिकाऱ्यांद्वारे थेट बैठकांमध्ये माहितीच्या विश्लेषणासाठी होऊ लागला आहे. हे डॅशबोर्ड मोबाईल, वेब ब्राऊजरच्या माध्यमातून सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. डॅशबोर्डच्या हाताळणी व वापरासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

### व्हाट्सअप चॅटबॉटद्वारे सर्वसामान्यांना मोबाईलवर अधिकृत माहिती

नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने ९३७०४३४६६२ या क्रमांकावर व्हाट्सअप चॅटबॉट जनतेला उपलब्ध करून दिला आहे. आयओएस, अँड्रॉइड आणि वेब प्लॅटफॉर्मवर चॅटबॉट उपलब्ध करून देण्यात आला असून नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांची माहिती, जिल्ह्यांसंबंधित सेवा येथे उपलब्ध करून देण्यात आल्या. पावसाची आकडेवारी, हवामान सूचना, धरण व तलावाची पातळी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विषयक माहिती, आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून देण्यासह जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदा तसेच पंचायत समिती कार्यालयांच्या अखत्यारितयेणाऱ्या विविध लोकसेवांचा लाभ याद्वारे देण्यात येतो. सीएम व्हाट्सअॅप चॅनल, आपले सरकार पोर्टल, तक्रार निवारण पोर्टल हा चॅटबॉट सोबतही जोडण्यात आला आहे. येथे हेल्पलाईन क्रमांक देण्यात आले असून अभिप्राय प्रणालीचाही यात समावेश आहे.

### "ए आय' व "ब्लॉकचेन'च्या वापराद्वारे राज्यासमोर निर्माण केले मॉडेल

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेन या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून नागपूर ग्रामीण मधील सातनवरी हे गाव देशातील पहिले स्मार्ट इंटेलिजंट गाव ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नेतृत्वात हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २४ ऑगस्ट २०२५ रोजी या प्रकल्पाचे उद्घाटन केले. मुख्य सचिवांनी या प्रकल्पास भेट देऊन वेळोवेळी आढावा घेतला. या प्रकल्पांतर्गत गावात स्मार्ट आरोग्य, पशुसंवर्धन, ड्रोन नियंत्रित खते व कीटकनाशक फवारणी, सीसीटीव्ही सर्वेलन्स, डिजीटल शिक्षण, महिला व बालकल्याण विभागाच्या ऑनलाईन सेवा, रस्त्यावरील स्मार्ट दिवे इत्यादी सेवा पुरविण्यात आल्या.

स्मार्ट शेतीमुळे २५ ते ४० टक्के पाण्याची बचत होते. खतांच्या किमतीस ३० टक्यांनी कपात होत. उत्पादनात २५ टक्केपर्यंत वाढ होते. ड्रोन द्वारे फवारणीमुळे कीटकनाशकांचा वापर ५० टक्यांपर्यंत कमी होतो. स्मार्ट स्ट्रिट लायटिंगमुळे ऊर्जेचा वापर ५० ते ७० टक्के कमी होऊन देखभाल खर्चही कमी होतो. या प्रकल्पाची दखल घेत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून राज्यातील अन्य पाच विभागांमधील ७५ गावांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येत आहे तर नागपूर जिल्ह्यातील १० गावांचा यात समावेश आहे. प्रकल्पाचा भांडवली खर्च राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असून सीएसआर तसेच योग्य संस्थांचे प्रायोजकत्व घेण्याची मुभा या प्रकल्पासाठी देण्यात आली आहे.

### जीआयएसच्या माध्यमातून वर्धा जिल्ह्यात युनिक आयडी

सातनवरीच्या स्मार्ट इंटेलिजन्स व्हिलेज ची अंमलबजावणी राज्यभर होत असतानाच नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नेतृत्वात वर्धा जिल्ह्याने तयार केलेल्या जीआयएस आधारित युनिक आयडी ची संकल्पना राज्यभर राबविण्यात येत आहे. नागरी मालमत्तेसाठी इन्फ्रा युनिक आयडी तयार करण्यासाठी समर्पित भूस्थानिक प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला. याद्वारे संपत्ती व मालमत्तेची योग्य नोंद घेण्यात आली.

या पद्धतीद्वारे स्थानिक आणि वैशिष्ट्यात्मक डेटा उपलब्ध झाला. त्यातून मिळालेली माहिती गुणवत्ता पूर्ण व अचूक ठरली आणि या माहितीच्या वापराद्वारे विकास कार्यांच्या नियोजनात सुधारणा करण्यात आली. या माहितीच्या आधारे निर्णय घेणे, नियोजन करणे, निधी वाटप, निधीचा वापर, मालमत्तेचा मागावा घेणे, मालमत्तेची स्थिती, योजनेचा वापर, क्षेत्रनिहाय मालमत्तेचे उपलब्धता नवीन मालमत्तेचा प्रस्तावधी आदींमध्ये या पद्धतीचा उपयोग झाला. वर्धा जिल्हेसह नागपूर विभागातील अनेक जिल्ह्यांमध्ये या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

राज्यभरात सात निकषाधारे ७ मे २०२५ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान एकूण सहा विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयांच्या कामगिरीचे मुल्यमापन कॉलिटी कॉन्सिल ऑफ इंडिया कडून १२७ निकषांवर करण्यात आले.या स्पर्धेत नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने २०० पैकी १५९.५२ गुण मिळवून राज्यात प्रथम स्थान पटकाविले. २८ एप्रिल २०२६ रोजी मुंबईत एका शानदार समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.विभागीय आयुक्तांच्यावतीने महसूल अपर आयुक्त राजेश खवले यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की,ङ्गहा पुरस्कार संपूर्ण नागपूर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचा परिणाम आहे. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहील.भविष्यातही अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जलद, सुलभ आणि दर्जेदार सेवा पुरविण्यावर भर दिला जाईल.

आयुक्तालयाने मिळिवलेला हा पुरस्कार केवळ नागपूर विभागापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्यातील प्रशासनासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

**रितेश मोतीरामजी भुयार,**
माहिती अधिकारी,
माहिती व जनसंर्क ,नागपूर

# पाणीटंचाईचा आराखडा रखडला



गोंदिया:– मार्च महिना संपण्याच्या शेवटच्या टप्प्यात आहे. अशात रखरखते उन्ह तापत असल्यामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. दुसरीकडे अनेक दुसराकड गावात जलजीवन मिशनची कामे रखडल्याने आतापासूनच पाण्याची बोंब सुरू झाली आहे. जिल्ह्यात आजघडीला ७ हजार ८९६ पैकी अनेक हातपंप देखील बंद पडले आहेत. त्यामुळे बायाबापड्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. एप्रिल, मे आणि जून महिना अद्यापही शिल्लक आहे. त्यामुळे अशीच अवस्था राहिल्यास मोठी पंचाईत होणार आहे. तर मार्च महिना संपत असताना देखील अद्यापही टंचाई निवारणार्थ कृती आराखडा तयार झाला नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागात चौका–चौकामध्ये ग्रामपंचायतीने हातपंप बसविलेले आहेत. काही ठिकाणी मुबलक पाणीसाठा आहे. प्रत्येक गावामध्ये पाणीपुरवठ्याची सार्वजनिक विहीर ग्रामपंचायतीच्या ताब्यात असताना केवळ भारनियम नामुळे गावकऱ्यांना पाणीपुरवठा करणे शक्य होत नाही. यासाठी गावोगावी बोअर घेऊन त्यावर ग्रामपंचायत हातपंप बसविते. हातपंप वीजपुरवठा असो किंवा नसो, केवळ हाताने पंप मारल्यास केव्हाही पाणी उपलब्ध असते. त्यासाठी जिल्ह्यात ७ हजार ८९६ हातपंप बसविण्यात आले आहेत. ते हातपंप दुरुस्त करण्याकरिता आठही तालुक्यात केवळ ५५ यांत्रिक कार्यरत आहेत. या यांत्रिकांना ४ ते ६ महिन्यापर्यंत मानधन देण्यात येत नाही. सध्या सगळीकडे पाण्याची ओरड सुरू झाले आहे.

बसविण्यात आलेल्या हातपंपांपैकी हजारापेक्षा जास्त हातपंप विविध कारणांमुळे बंद पडले आहेत. तर कित्येक हातपंप पाण्याचे स्त्रोत आटल्यामुळे हातपंपांना पाणी येत नाही. मार्च महिना संपण्याच्या वाटेवर असताना देखील जिल्हा परिषदेने अद्यापही पाणी टंचाई कृती आराखडा तयार केलेला नाही. त्यामुळे दुरुस्तीसाठी निधी नसल्याची ओरड आहे. या सर्व दुर्लक्षित धोरणाचा फटका मात्र ग्रामीण भागातील नागरिकांना बसत आहे.

### जिल्ह्यात तालुकानिहाय बोरवेलची संख्या

| तालुका | बोरवेल |
|---|---|
| गोंदिया | ३२८ |
| आमगाव | १०८४ |
| सालेकसा | ११६० |
| अर्जुनी मोरगाव | १०४० |
| सडक अर्जुनी | ७६४ |
| तिरोडा | १३४९ |
| गोरेगाव | ९८३ |
| देवरी | ५८८ |
| एकूण | ७८९६ |

### दुरुस्तीकामातही अडचण

**ज्या गावातील हातपंप बंद पडले आहेत. त्या गावापर्यंत साहित्य घेवून पोहोचण्यासाठी यांत्रिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागतो. साहित्य नेण्यासाठी जिल्हा परिषदेकडे वाहन देखील नाही. यांत्रिकी विभागाने पाणीपुरवठा विभागाकडे गेल्या दोन वर्षांपूर्वीच वाहनाची मागणी केली होती. मात्र अद्यापही ती मागणी पूर्ण करण्यात आली नाही. अशात रखरखत्या उन्हात यांत्रिकी विभाग हातपंपांची दुरुस्ती करणार तरी कशी? असा सवाल उपस्थित होत आहे. तर दुसरीकडे यांत्रिकांना यांत्रिकांना महिनोमहिने मानधन देण्यात येत नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबाची उपासमार होत आहे. हातपंप जिल्हा परिषदेतर्फे लावण्यात येते. त्यासाठी पाणीपट्टी कर वसूल करण्यात येतो. त्याच कराच्या माध्यमातून देखभाल, दुरुस्ती आणि साहित्य खरेदी करण्यात येते. मात्र ग्राम पंचायतींकडून पाणीपट्टीची रक्कम वसूल होत नाही. परिणामी देखभाल आणि दुरुस्तीवर त्याचा ताण पडतो.**

# नवीन प्रशासकीय इमारतीत जीवाशी खेळ

## मुदतबाह्य अग्निशमन यंत्र; कर्मचाऱ्यांसह नागरिकांचीही सुरक्षा धोक्यात

गोंदिया :– येथील नवीन प्रशासकीय इमारतीत सुरक्षेचा बोजवारा उडाल्याचे वास्तव समोर आले आहे. या इमारतीत बसविण्यात आलेले अग्निशमन यंत्र मुदबाह्य असून, याकडे कोणाचेही लक्ष नाही. त्यामुळे अधिकारी, कर्मचारीच नव्हे, तर कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांचीही सुरक्षा धोक्यात आली आहे.

कामानिमित्त जिल्हास्थळी येणाऱ्या नागरिकांची पायपीट थांबावी, एकाच छताखाली अनेक कार्यालये असावीत, या उद्देशाने काही वर्षांपूर्वी शहराच्या मध्यभागी अर्थात येथील जयस्तंभ चौकाशेजारी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यात आले. उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा पणन अधिकारी कार्यालय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय अशा अनेक महत्त्वाच्या कार्यालयांचा कारभार




या इमारतीतून चालतो. दररोज मोठ्या संख्येने अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांची वदर्ळ या इमारतीत असते. मात्र, अतिमहत्त्वाच्या अग्निसुरक्षेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे.


इमारतीत बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रे अक्षरशः शोभेची वस्तू आहेत. ती पूर्णपणे मुदतबाह्य झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, काही यंत्रांची २०१८ पासून ना तपासणी झाली, ना पुनर्भरण. परिणामी, आग लागल्यास ही यंत्रे उपयोगी पडणार नाहीत.

इतकी गंभीर बाब असताना संबंधित प्रशासकीय यंत्रणेचे होणारे दुर्लक्ष निष्काळजीपणाचे नव्हे, तर नागरिकांच्या जीवाशी सरळ खेळ असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रशाकीय यंत्रणेने लक्ष देऊन योग्य उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

### दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण?

अग्निशमन यंत्रांच्या देखभालीकडे यंत्रणेने पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे यावरून दिसून येते. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास कोण जबाबदार राहील, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# वीजदरात १० ते १४ टक्के कपात; १एप्रिलपासून वीज स्वस्त



गोंदिया:– उन्हाळ्याच्या हंगामात सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे. १ एप्रिलपासून वीज दरांमध्ये १० ते १४ टक्क्यांची कपात लागू होणार असून ग्राहकांच्या मासिक खर्चात घट होईल. नवीन दरांनुसार, विजेच्या वापराच्या सर्व चारही टप्प्यांमध्ये दरकपात करण्यात आली आहे. ० ते १०० युनिट्सपर्यंतच्या वापरासाठीचा दर ४.७६ वरून कमी करून ४.३० करण्यात आला आहे.

१०१ ते ३०० युनिट्सच्या टप्प्यासाठी दर ७.९६ वरून ७.१० पर्यंत खाली आणला गेला आहे; ३०१ ते ५०० युनिट्ससाठी हा दर १३.५५ वरून ११.६४ करण्यात आला आहे आणि ५०० युनिट्सपेक्षा अधिक वापरासाठीचा दर १४.५५ वरून कमी करून १२.६४ प्रति युनिट निश्चित करण्यात आला आहे. हा निर्णय विद्युत नियामक आयोगाने घेतला आहे. महावितरण, अदानी, बेस्ट आणि टाटा यांसारख्या वीज वितरण कंपन्यांनी सादर केलेल्या प्रस्तावांवर आधारित नवीन दर निश्चित करण्यात आले आहेत. याचा थेट लाभ राज्यातील सर्व स्तरांतील घरगुती ग्राहकांना होईल. महायुती सरकारची स्थापना होत असताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज दरांमध्ये कपात करण्याचे आश्वासन दिले होते. ऊर्जा विभागाचा कार्यभार सांभाळत असताना, त्यांनी अधिकाऱ्यांना वीज दर कमी करण्याचे निर्देश दिले होते.उन्हाळ्याच्या हंगामात विजेचा वापर वाढल्यामुळे वीज बिले साधारणपणे अधिक येतात. या पृष्ठभूमीवर वीज दरांमधील ही कपात ग्राहकांसाठी सुखद धक्का असून यामुळे घरगुती बजेटवरील ताण कमी होण्यास मदत होईल. तज्ज्ञांच्या मते, वीज दरातील या कपातीमुळे केवळ सामान्य नागरिकांनाच दिलासा मिळणार नाही, तर राज्याच्या आर्थिक घडामोडींवरही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. याचा लाभ लहान व्यावसायिक आणि मध्यमवर्गीयांना होईल.

### दर २०३० पर्यंत लागू राहतील

**महावितरणच्या पाच वर्षांच्य वीज दर याचिकेवर आयोगाने आदेश दिला आहे. त्यानुसार घरगुती औद्योगिक, वाणिज्यिक ग्राहकांसाठीचे दर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने दरवर्षी कमी होतील.**

### उद्योगांना दिलासा

**उद्योगांना व व्यावसायिक ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठीची टीओडी सवलत सुरूच राहणार आहे. एप्रिल ते सप्टेंबर महिन्यात १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च महिन्यात २५ टक्के सवलत या ग्राहकांना मिळणार आहे. उत्पादनासाठीच्या महत्त्वाच्या पहिल्या पाळीत सवलतीच्या दराने वीज मिळेल.**

# मनरेगाची कामे नसतील तर मजुरांना बेकारी भत्ता द्या-खोडशिवणी ग्रा.पं.चा मनरेगा आयुक्तांना प्रस्ताव

सडक अर्जुनी: – तालुक्यातील खोडशिवणी ग्रामपंचायतचे मस्टर लॉक असल्याने व १०७ मजुरांनी नमुना चार अर्ज भरून कामाची मागणी केली आहे. मात्र, मस्टर लॉक असल्याने ग्रामपंचायतीला मनरेगाची कामे उपलब्ध करून देता येता नाहीत. नियमानुसार मजुरांनी कामाची मागणी केल्यानंतर त्यांना ७ दिवसांत काम उपलब्ध करून दिल्यास बेकारी भत्ता देण्याची तरतूद आहे. त्यानुसार या मजुरांना भत्ता देण्याची मागणी खोडशिवणी ग्रामपंचायतने मनरेगा आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २० पेक्षा



अधिक कामे अपूर्ण असल्याने खोडशिवणी ग्रामपंचायतचे मस्टर लॉक करण्यात आले आहे. हीच स्थिती जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींची आहे. त्यामुळे मनरेगाअंतर्गत कामे सुरू करण्यासाठी हजेरीपत्रक तयार होत नाही. त्यामुळे मजुरांना कामे उपलब्ध करून देता येत नाहीत. ग्रामपंचायत खोडशिवणीकडे गावातील ७० कुटुंबांतील जॉब कार्डधारक १०७ मजुरांनी ग्रामपंचायतकडे कामाची मागणी केली आहे, पण कामे उपलब्ध करून देण्याची अडचण असल्याने त्यांना सात दिवसांच्या आत काम उपलब्ध करून देता येत नाही. त्यामुळे नियमानुसार ७दिवसांत काम उपलब्ध करून दिले नाही तर कामाची मागणी करणाऱ्या मजुरांना बेकारी भत्ता देण्याची तरतूद आहे.त्यामुळे यावर संबंधित विभागाने तोडगा काढून योग्य मार्गदर्शन करावे, असे पत्र खोडशिवणी ग्रामपंचायतचे सरपंच गंगाधर परशुरामकर यांनी मनरेगा आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना पाठविले आहे.

### निर्णय झाल्यास अनेक ग्रामपंचायतींना होणार मदत

**जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींचे मस्टर लॉक असल्याने त्यांना मनरेगाची कामे सुरू करण्यास अडचण जात आहे. परिणामी, मजुरांनी कामाची मागणी करूनसुद्धा कामे उपलब्ध करून देता येत नाहीत. त्यामुळे मजुरांची कामाच्या शोधात भटकंती सुरू आहे. त्यामुळे शासन आणि प्रशासन यावर काय निर्णय घेते यावर बरेच काही अवलंबून आहे. निर्णय झाल्यास त्याची ग्रामपंचायतींना मदत होणार आहे.**

# संघटन सृजन अभियानातून निवडला जाणार काँग्रेसचा नवा जिल्हाध्यक्ष-सविता बेनीवाल




गोंदिया:– काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या संकल्पनेतून ङ्गसंघटन सृजन अभियानफ या नव्या उपक्रमाची सुरुवात केली. पक्ष संघटन बळकट करण्यासाठी जिल्हा काँग्रेस समित्यांना सक्षम करणे आणि उत्तरदायित्व आधारित यंत्रणा उभारणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे संघटन सृजन अभियानाच्या गोंदिया व भंडारा जिल्हा पर्यवेक्षक श्रीमती सविता बेनीवाल यांनी सांगितले.गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षाची निवड प्रकिया व पदाधिकारी,कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याकरीता तीन दिवसीय दौर्यावर त्यांचे आज गोंदियात आगमन झाले.त्यावेळी त्या येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत(दि.२७)होत्या.त्यांच्यासोबत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व संघटन सृजन अभियान प्रभारी यांचे समन्वयक प्रविण दरेकर,गोंदिया जिल्हा अध्यक्ष व माजी आमदार दिलीप बनसोड उपस्थित होते.

हे अभियान स्थानिक स्तरावर कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यासाठी आणि काँग्रेसची पकड अधिक मजबूत करण्यासाठी राबवले जात आहे.पंचायत पातळीपर्यंत काँग्रेस संघटना बळकट करणे हा मुख्य उद्देश असल्याचे श्रीमती बेनीवाल म्हणाल्या.काही दिवसांपूर्वीच अखिल काँग्रेस पक्षाचे ८४वे अधिवेशन गुजरातमधील अहमदाबाद येथे पार पडले.त्या अधिवेशनात ङ्गसंघटन सृजन अभियानफ सुरु करण्याची घोषणा केली होती.त्यानुसार हे अभियान काँग्रेसला नवसंजीवनी देण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.ङ्गसत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासोबतच कार्यक्षम कार्यकर्त्याला संधी देणे आणि चिठ्ठीतून पदाधिकारी निवडण्यावर आळा घालण्याकरीता हे अभियान चालविण्यात येत असल्याचे सांगितले.गोंदिया जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदाकरीता येत्या १९ एप्रिलपर्यंत अर्ज मागविण्यात आले असून २१ एप्रिलला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडे अहवाल सोपवला जाईल.आलेल्या अर्जावर एआयसीसीचे पदाधिकारी चर्चा करुन निर्णय घेणार असल्याचेही श्रीमती बेनीवाल यांनी सांगितले.

# नागरिकांचा पुढाकार; मखोडशिवनीफ्त १५ हजार वृक्षांची लागवड, जलसंधारणाचाही वसा

**गेल्या तीन वर्षांत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी योजना राबविल्या असून, पर्यावरणपूरक विकासकामांवर भर दिला आहे. भविष्यातही सर्वांच्या सहकार्याने गावाचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा प्रयत्न राहील.**

**- गंगाधर परशुरामकर, सरपंच, खोडशिवनी**

सडक अर्जुनी :– गेल्या तीन वर्षांत राबविण्यात आलेल्या विविध लोककल्याणकारी योजना आणि पर्यावरणपूरक विकासकामांमुळे तालुक्यातील खोडशिवनी ग्रामपंचायत स्मार्ट ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. सरपंच गंगाधर परशुरामकर यांची संकल्पना व विशेष प्रयत्नातून गावातील विकासाला नवी दिशा मिळाल्याचे सांगितले जाते.

राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेअंतर्गत गावात १५ हजारांहून अधिक वृक्षलागवड करण्यात आली. त्यात बांबू, फळबाग आणि विविध औषधी वनस्पतींचा समावेश आहे. तसेच ७०० कुटुंबीयांना आंब्याची रोपे वितरित करून हरित गावाचा संकल्प बळकट करण्यात आला. ग्रामपंचायतीने पिण्याच्या स्वच्छ



पाण्यासाठी आरओ जलशुद्धीकरण यंत्र बसविले असून, गावातील सर्व पाणीपुरवठा योजना सौरऊर्जेवर चालविली जाते. शिक्षण क्षेत्रातही महत्त्वपूर्ण काम करत शाळेत साने गुरुजी सभागृह, दोन नवीन वर्गखोल्या आणि स्वच्छतेसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली.

शाळा व गावातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले. गावातील युवकांसाठी स्पर्धा परीक्षा व पोलिस भरतीसाठी धावपट्टी, खुली व्यायामशाळा आणि वाचनालय उभारण्यात आली. याशिवाय सहा व्यापारी संकुले उभारण्यात आली. जलसंधारणासाठी मागील दोन वर्षांत तलावातील गाळ काढण्याचे काम करण्यात आले असून, यामुळे पाणी साठवण क्षमता वाढली. मुलगी जन्माला आल्यास प्रोत्साहनपर अनुदान देऊन समाजात सकारात्मक संदेश दिला जातो.

### रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वाचा बदल उद्यापासून लागू होणार

नवी दिल्ली–नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वाचा बदल लागू होणार आहे. १ एप्रिल २०२६ पासून रेल्वे तिकीट बुकिंग आणि रद्द करण्याच्या नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या नव्या नियमांची माहिती नसल्यास प्रवाशांना आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. त्यामुळे रेल्वे प्रवास करणाऱ्यांनी तिकीट रद्द करण्याच्या सुधारित नियमांची माहिती घेणे आवश्यक ठरणार आहे.

भारतीय रेल्वेने तिकीट रद्द करण्याच्या धोरणात बदल जाहीर केला आहे. यानुसार आता प्रवाशांना त्यांच्या ट्रेनच्या सुटण्याच्या वेळेपूर्वी किमान ८ तास आधी तिकीट रद्द करणे आवश्यक राहणार आहे. जर प्रवाशांनी या कालावधीनंतर तिकीट कॅन्सल करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना कोणताही परतावा मिळणार नाही. त्यामुळे प्रवास रद्द करण्याचा निर्णय वेळेत घेणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पूर्वीच्या नियमांनुसार ट्रेन सुटण्याच्या ४ तासांपूर्वी तिकीट रद्द केल्यास काही प्रमाणात पैसे परत मिळत होते. मात्र नव्या नियमांनुसार ही मुदत वाढवून ८ तास करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना आधीपेक्षा लवकर तिकीट रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. विशेष म्हणजे एकाच वेळी कुटुंबातील अनेक सदस्यांसाठी तिकीट आरक्षित केले असले तरीही हा नियम सर्व तिकिटांवर लागू राहणार आहे.

### राज्यात 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ

मुंबई :– महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या नावाने अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे.

# माँ मांडोदेवी धार्मिक पर्यटनस्थळाचे भव्य रूपांतरण घडविण्यास आम्ही कटिबद्ध — राज्य मंत्री एड. आशिष जायसवाल

गोंदिया– महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर वसलेल्या गोंदिया जिल्ह्यातील घनदाट जंगल आणि नैसर्गिक डोंगररांगा यांच्या कुशीत वसलेले माँ मांडोबाई देवस्थान, बघेडा/टेढा येथे रामनवमीच्या पावन पर्वावर लक्ष्यापेक्षा अधिक १९१ सर्वजातीय नवदांपत्यांनी माँ मांडोदेवीचे आशीर्वाद घेऊन नवीन वैवाहिक जीवनाची सुरुवात केली. या वर्षी हजारो भक्तांच्या उपस्थितीत हा सामूहिक विवाह सोहळा भक्तांच्या प्रचंड उत्साहाने सफल पार पडला.

मांडोबाई देवस्थानातील हा सलग ३४वा सर्वजातीय सामूहिक विवाह सोहळा असून तो २७ मार्च रोजी माँ मांडोबाईच्या कृपेने संपन्न झाला. नवदांपत्यांना आशीर्वाद देण्यासाठी राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन आणि कायदा–न्याय विभागाचे राज्यमंत्री ॲड. आशिष जायसवाल कुटुंबासह उपस्थित होते. त्याचप्रमाणे देवस्थानचे




अध्यक्ष व गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार विनोद अग्रवाल, माजी आमदार सहेसराम कोरोटे, हेमंतभाऊ पटले, खोमेशभाऊ रहांगडाले, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, पंस. गोंदिया सभापती मुनेश रहांगडाले,उषाताई मेंढे,दीपाताई चंद्रिकापुरे, सविता अग्रवाल, चेतालीताई नागपुरे, सुमित भालोटिया, जीवनेश मिश्रा यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सामूहिक विवाह सोहळ्याबाबत देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, सर्वजातीय सामूहिक विवाहाची सुरुवात १९९३ पासून याच देवस्थानातून झाली आहे आणि हा सलग ३४वा वर्ष आहे. आजच्या काळात हा उपक्रम समाजातील अनेक कुटुंबांचा वेळ आणि खर्च वाचवणारा प्रभावी उपक्रम ठरत आहे. दरवर्षी विवाहगटकांची वाढती संख्या ही आयोजन समितीच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाची साक्ष आहे. आगामी काळात सर्व धर्मीय लोकांनी या उपक्रमांतर्गत विवाह नोंदणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यमंत्री ॲड. आशिष जायसवाल यांनी माँ मांडोदेवीला नमन करून नवदांपत्यांना आशीर्वाद दिले. हजारो भक्तांच्या उपस्थितीने भारावून जाऊन त्यांनी सांगितले की, मुंबईत असताना मांडोदेवी देवस्थानाबद्दल जे ऐकले, ते आज प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य लाभले. ङ्गया पवित्र देवस्थानाच्या भव्य विकासासाठी मी कटिबद्ध आहे. लवकरच मी दिवसाच्या वेळी संपूर्ण क्षेत्राची पाहणी करणार असून येथे कोणते विकासकाम करता येईल याचा आढावा घेऊन निधी उपलब्ध करून देण्यात येईल,ङ्ख असे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, ङ्गमी त्या जिल्ह्याचा जावई आहे जिथे माँ मांडोदेवी विराजमान आहे, हा माझा सन्मान आहे. या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे ही माझी प्राथमिकता आहे.

सामूहिक विवाहात नवदांपत्यांना लग्नासाठी आवश्यक जीवनोपयोगी वस्तू, वस्त्र, तसेच सोन्याचे मंगलसूत्र प्रदान करण्यात आले. मोठ्या संख्येने भक्त उपस्थित असल्यामुळे पोलिस प्रशासनाने मुंडीपार–हरदौली मार्ग तसेच मंदिर परिसरात उत्कृष्ट व्यवस्था राखली, याबद्दल आयोजन समितीने आभार मानले.

या संपूर्ण सोहळ्याला यशस्वी करण्यात देवस्थानाचे अध्यक्ष आमदार विनोद अग्रवाल, सचिव डॉ. लक्ष्मण भगत, उपाध्यक्ष भैयालाल सिंदराम, कोषाध्यक्ष विश्वनाथ असाटी, सहसचिव कुशनजी घासले, सदस्य डॉ. जितेंद्र मेंढे, शालिकराम उईके, सखाराम सिंदराम, दिलीप खंडेलवाल, राहुल अग्रवाल, नंदकिशोर गौतम, तसेच मंदिराचे पुजारी पंडित अयोध्यादास महाराज, किशोर शेंडे, अमोल भारती आणि बघेडा (टेढा) येथील ग्रामस्थांचे अनन्यसाधारण योगदान राहिले. मंगलाष्टक नारायण बहेकार यांनी केले, तर संचालन जगणेश गुरुजी यांनी केले.

# आचार्य विनोबा भावे यांचे विचार आजही प्रासंगिक-रमेश भय्या

गोंदिया :– स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधींचे मोठे योगदान राहिले. गांधींचे दोन उत्तराधिकारी होते. राजकीय उत्तराधिकारी पंडित जवाहरलाल नेहरू आणि आध्यात्मिक उत्तराधिकारी आचार्य विनोबा भावे. १९५१ मध्ये भूदान चळवळीत ४५ लाख एकर जमीन मिळवली. आजही जमिनीसंदर्भात वाद सुरू आहेत. त्या काळात आचार्य विनोबा भावे गरिबांना जमीन वाटप करत असत. त्यांचे विचार आजही तितकेच प्रासंगिक आहेत, असे विनोबा भावे यांचे शिष्य उत्तर प्रदेशातील शाहजहापूरचे रमेश भय्या यांनी सांगितले.शहरातील रिंग रोडवरील श्री गणेश ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित सद्भावना यात्रा व सत्कार सोहळा शनिवारी आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी हरियाणाचे राजेंद्र यादव, प्रयागचे राकेश प्रसाद पांडे, जालंधरनाथ, शाहजहापूरचे कमलेश प्रेमी, संस्थेचे



संस्थापक सचिव विजय बहेकार, माजी जिल्हा परिषद सभापती धन्नालाल नागरीकर, प्रा. सविता बेदरकर, संथागारचे प्रभाकर गजभिये, प्रा. रामकृष्ण चौधरी, संचालक गजानन उमरे, कृषी अधिकारी धनलाल उईके, निवृत्त बीडीओ झामसिंग टेंभरे, राधाबाई नर्सिंग शाळेच्या प्राचार्या प्रिसा वर्मा उपस्थित होते.

राजेंद्र भाई म्हणाले, देशातील सर्वात मोठा चमत्कार भूदान चळवळीतून घडला. संत विनोबा भावे यांनी पायी यात्रा केली. आंध्र प्रदेशातील पोचमपल्ली येथे अहिंसेला आळा घातला. भावे यांच्या आग्रहावर रामचंद्र रेड्डी यांनी १०० एकर जमीन दान दिली.

रमेश भय्या यांनीही ३५ हजार किलोमीटर पायी यात्रा केली आहे. वर्धा येथील पवनार आश्रमहून २५ मार्चला यात्रेला सुरुवात झाली. ही यात्रा महाराष्ट्र, छत्तीसगडमधून १८ एप्रिलला आंध्र प्रदेशातील पोचमपल्लीला पोहोचेल.या सोहळ्यात सी. एम. पटेल इंग्लिश शाळेचे शिक्षक अनिल शेलोकर, लीना साखरे, रितू नागदेव, सुषमा पाठक, राधाबाई नर्सिंग शाळेच्या रुपाली गौतम, माया मोहारे, अलिषा पटेल, नंदिनी भिवगडे, श्रुती ठाकरे, तेजस्वी टेंभरे तसेच विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.